cmyk

## संपादकीय

### काँग्रेसच्या लढ्याला बळ मिळणार का?

काँग्रेसने राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात राज्यभर आंदोलन केले, काही वर्षापूर्वी काँग्रेसने एखादा कार्यक्रम किंवा अभियानाची घोषणा केली तर त्याचे पडसाद हे राज्यभरात उमटत होते. मात्र काँग्रेसमध्ये आलेली मरगळ, महत्त्वाच्या नेत्यांनी केलेला पक्षत्याग यामुळे आता काँग्रेसची भूमिका ही सर्वसामान्य लोकांपर्यंत कुठे तरी पोहचत नाही. महाविकास आघाडीची भूमिका हीच काँग्रेसची भूमिका आत्तापर्यंत राहीली होती. आत्ता मात्र काँग्रेसने निवडणूक निकालाविरोधात न्यायालयीन संघर्षाचा आवाज उठविला आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२७७ | बुधवार, दि.२९ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने- ६ | किंमत ३ रूपये

# राज्यात १ हजारहून अधिक दुधाचे नमुने जप्त



## अन्न आणि औषध प्रशासनाची भेसळखोरांविरोधात धडक मोहीम

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्य अन्न आणि औषध प्रशासनाने कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात मंगळवारी (दि.२८) १ हजार ६७ दुधाचे नमुने घेण्यात आले आहेत. अहवाल येताच संबंधितांविरोधात कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती अन्न व दुग्ध विभागाच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.**

राज्यात २०२३-२४ या आर्थिक वर्षात दिवसाला १ कोटी ७१ लाखाहून अधिक दूध संकलन होते. महाराष्ट्रात दुधाचे भेसळीच्या प्रमाणात मोठी वाढ झाली होती. यावर अंकुश लावण्यासाठी दुग्धविकास विभागाने धडक मोहीम राबवली आहे. विविध जिल्ह्यात दुधाची मोठ्या प्रमाणात भेसळ करण्यात येत असल्याचे निर्दर्शनास आले आहे. पान २ वर

### खासगी प्रयोगशाळांबरोबर करार

दुधाचे नमुने घेतल्यानंतर त्यासंदर्भातील अहवाल येण्यास विलंब होत असल्याने दुधात भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करण्यात अडथळे येतात. त्यामुळे दुधाच्या नमुन्यांचा अहवाल जलदगतीने मिळावा यासाठी खासगी प्रयोगशाळांबरोबर करार करण्यात आला आहे. त्यामुळे या नमुन्यांचा अहवाल लवकर मिळण्यास मदत होणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांकडून देण्यात आली.

# राखेचा व्यवसाय लाभाचे पद ठरत नाही

## धनजंय मुंडेंनी फेटाळला दमानियांचा दावा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडेंनी आपल्याकडे कोणतेही लाभाचे पद नसल्याचे नमूद करत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांचा दावा फेटाळून लावला आहे. परळी स्थित औष्णिक विद्युत प्रकल्पाची राख उचलण्याचा व्यवसाय लाभाचे पद ठरत नाही. त्यामुळे यासंबंधीच्या आरोपांत कोणतेही तथ्य नाही, असे ते म्हणाले. आमदार संदीप क्षीरसागर यांचा सरपंच हत्याकांडातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याच्याशी संबंध असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.**

दमानियांनी मुंडेंकडे आर्थिक लाभाचे पद असल्याचा दावा करत त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. त्यांच्या मते, महाजेनको ही कंपनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची पूर्ण मालकीची उपकंपनी आहे. या कंपनीने धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांच्या कंपनीला एक कंत्राट देण्यात आले होते. या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी आपल्या कंपनीचा थेट फायदा करून घेतला. मुंडे म्हणाले की, मी राजीनाम्याच्या प्रश्नाला उत्तर देणार नाही. अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली आहे. त्यांनी त्यांच्याकडे काही कागदपत्रेही दिली आहेत. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पान २ वर

### आ.क्षीरसागरांचा कृष्णा आंधळेशी संबंध असल्याचा आरोप

पत्रकारांनी यावेळी बीडच्या सरपंच हत्याकांडातील फरार आरोपी कृष्णा आंधळे याच्यासोबत काहीतरी काळेबेरे घडण्यासंबंधी आमदार संदीप क्षीरसागर यांनी केलेल्या दाव्याविषयी मुंडे म्हणाले, संदीप क्षीरसागर यांना एवढी माहिती असेल किंवा आणखी कुणाला काही याविषयी माहिती असेल तर याचा अर्थ असा की, त्यांचे व त्या आरोपीचे कुठेतरी संबंध आहेत. ते संबंध असल्याशिवाय त्यांना ही माहिती मिळू शकत नाही. त्या संबंधांतून अशा पद्धतीने बातम्या पेरायच्या व आपल्याला ती बातमी मिळते, असे ते म्हणाले.

# धनंजय मुंडेंचा राजीनामा तुर्त नाही !

## अजित पवार-दवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा





**मुंबई । प्रतिनिधी**

**या प्रकरणातील तथ्य आणि पुराव्यानिशी अजून कुणाचे नाव आल्यास त्यावरही कठोरात कठोर कारवाई केली जाईल. मात्र कुणाचा काही संबंधच नसताना कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. किंबहुना कुणाचा संबंध असल्यास त्याला अजिबात पाठीशी घातले जाणार नाही. हिच भूमिका माझ्यासह राज्याच्या मुख्यमंत्र्यांची असल्याची प्रतिक्रिया देत धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासंदर्भात अजित पवार यांनी भाष्य केले आहे.**

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी काही कागदपत्रे मला दिली असून ती मी बघितली आहेत. कॅबिनेट झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार होतो. पान २ वर

### बीड प्रकरणात ईडीची एन्ट्री?

संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय वाल्मिक कराडच्या अडचणीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. या प्रकरणाची ईडीने स्वतंत्र चौकशी करावी अशी मागणी करणारी एक याचिका आरटीआय कार्यकर्ता अमेय तिरोडकर यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे. बीड प्रकरणात कॅबिनेट मंत्र्याचे नाव सातत्याने समोर येत असल्याने पोलिस तपासाला मर्यादा येत असल्याचे या याचिकेत नमूद करण्यात आले आहे. धनंजय मुंडे यांच्या संबंधित अनेक कंपन्यांचे व्यवहार, मालमत्तांची यादी समोर येत आहे. त्यामुळे या प्रकरणाात निवडणूक आयोगाला प्रतिवादी करावे अशी मागणी या याचिकेतून करण्यात आली आहे. आरटीआय कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी उच्च न्यायालयात ही याचिका दाखल केली असून त्यावर लवकरच सुनावणी अपेक्षित आहे.

### मुंडेंच्या राजीनाम्यावरून कोर्टात जाणार-अंजली दमानिया



धनंजय मुंडेंचा राजीनामा घेतला नाही तर कोर्टात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा अंजली दमानिया यांनी दिला. आजपर्यंत ज्यांची भेट घेतली, त्यांनी कार्यवाही का केली नाही? यासाठी त्यांनाही प्रतिवादी करावे लागेल असा इशारा दमानिया यांनी दिला आहे. अंजली दमानिया यांनी सोमवारी अजित पवारांची भेट घेतली होती. दमानियांच्या मागणीवर बोलताना अजित पवारांनी धनंजय मुंडेंची पाठराखण केल्याचे दिसते आहे. जे दोषी नाहीत त्यांच्यावर कारवाईचा प्रश्नच नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे आपल्या राजीनाम्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारच उत्तर देतील, असं धनंजय मुंडेंनी सांगितले. तर याबाबतचा निर्णय अजित पवारानांच घ्यायचा आहे, फडणवीसांचा त्यामध्ये संबंध नाही, असे सुरेश धस यांनी म्हटले आहे.

### ३१ जानेवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन

नवी दिल्ली: संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची तारीख जाहीर झाली आहे. येत्या ३१ जानेवारीपासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. लोकसभा सचिवालयाने अर्थसंकल्पीय अधिवेशनाबाबत अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू ३१ जानेवारी रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांना संबोधित करतील. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानंतर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण १ फेब्रुवारीला देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. अधिसुचनेनुसार, १८ व्या लोकसभेचे चौथे अधिवेशन ३१ जानेवारी २०२५ रोजी सुरू होईल. पान २ वर

# बीड जिल्हा मध्यवर्ती बँके संदर्भात आज अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक

## सहकारमंत्री यांच्यासह मंत्री पंकजाताई मुंडे राहणार उपस्थित



**मुंबई । प्रतिनिधी**

**मागील काही वर्षांपासून अडचणीत असलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक मदत करून गतवैभव प्राप्त करून देण्याच्या अनुषंगाने बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या विविध विषयांवर बुधवारी (दि.२९) रोजी सकाळी ११.१५ वा. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थ व नियोजन मंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत सहकार विभागाने बैठकीचे आयोजन केले आहे.**

बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला आर्थिक मदत करून गतवैभव प्राप्त करून देणे त्याचबरोबर पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या धर्तीवर बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्गाला कर्ज पुरवठा करणे यांसह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होऊन जिल्हा बँकेला बूस्टर डोस मिळणे अपेक्षित आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांच्या विनंतीवरून या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीस सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांसह नियोजन व सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच व्हिसी द्वारे बीड जिल्हाधिकारी आणि जिल्हा बँकेचे प्रशासकीय मंडळ उपस्थित राहणार आहेत. मागील काही वर्षांपासून अडचणीत असलेल्या बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला या बैठकीच्या माध्यमातून आर्थिक पान २ वर

# मनोज जरांगेंनी पिले ग्लासभर पाणी; देशमुख कुटुंबाच्या विनंतीला दिला मान!



**जालना । प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगेंनी आपल्या उपोषणाच्या चौथ्या दिवशी ग्लासभर पाणी पिले. बीडच्या मस्साजोगचे मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या मातोश्री व मुलीच्या हातून त्यांनी पाणी पिले. सलगच्या उपोषणामुळे जरांगे यांची प्रकृती सातत्याने बिघडत चालली आहे. त्यामुळे मराठा आरक्षणावर तत्काळ तोडगा काढण्याची मागणी केली जात आहे. पान २ वर

### धाराशिवमध्ये आंदोलक जिल्हाधिकारी कार्यालयात

धाराशिवमध्ये मराठा आंदोलक चांगलेच आक्रमक झालेत. त्यांनी धाराशिवच्या जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतःला कोंडून घेत आपले आंदोलन सुरू केले आहे. यामुळे पोलिसांची एकच धावपळ उडाली. मराठा आंदोलकांनी जिल्हादंडाधिकाऱ्यांच्या कार्यालयात स्वतःला कोंडून घेतले आहे. त्यांनी दार आतून बंदही केले आहे. यामुळे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे यांच्यावर कार्यालयाबाहेर थांबण्याची वेळ आली आहे.

### कोअर टीममधील ८ जणांना पोलिसांची नोटीस

जरांगेंच्या कोअर टीममधील ८ जणांना गोंदी पोलिसांनी नोटीस बजावली आहे. जरांगेंसह उपोषणात बसलेल्या इतर उपोषणकर्त्यांच्या जुन्या आजारांचे वैद्यकीय रिपोर्ट उपलब्ध करून न दिल्याने ही नोटीस बजावण्यात आली आहे. उपोषणातील सर्व उपोषणकर्त्यांच्या नावाच्या सविस्तर यादीसह त्यांचे मोबाईल क्रमांक, उपोषणकर्त्यांचे पत्ते द्या, अशी मागणी पोलिसांनी या नोटीसीद्वारे केली आहे.

# पेट्रोल- डिझेल वाहने टप्प्याटप्प्याने बंद होणार!

## राज्य सरकारने स्थापन केली तज्ज्ञांची समिती, केवळ सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांना परवानगी?

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबईत पेट्रोल आणि डिझेल वाहने टप्प्याटप्प्याने बंद करण्याबाबत राज्य सरकारने सात सदस्यांची समिती स्थापन केली असल्याचे वृत्त समोर आले आहे. राज्य सरकारने निवृत्त आयएएस अधिकारी सुधीर कुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन केलेली समिती तीन महिन्यांत शिफारशींसह अहवाल सादर करणार आहे.**

९ जानेवारी रोजी एका जनहित याचिकेवर स्वतःहून पान २ वर

# बेकायदेशीर धर्मांतराचा गुन्हा हत्या, बलात्कार, दरोडा इतका गंभीर नाही - सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

बेकायदेशीररीत्या करण्यात आलेले धर्मांतर हा काही हत्या, बलात्कार किंवा दरोडा इतका गंभीर गुन्हा नाही, असे निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेशातील मौलवींना जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला यांच्या अध्यक्षतेखालील दोन सदस्यीय खंडपीठाने मौलवींना कनिष्ठ न्यायालय पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १.०० क्विंटल | ३,१०० | ३,१०० | ३,१०० |
| ज्वारी/हायब्रिड :२५.०० क्विंटल | २,१७० | २,८४० | २,८४० |
| मका/लोकल:१५.५० क्विंटल | २,१०३ | २,१०३ | २,१०३ |
| तूर : ८४.५० क्विंटल | ६,००० | ७,००१ | ६,७७६ |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: १.५० क्विंटल | २,७५० | २,७९१ | २,७७० |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,२५० | ७,२५० | ७,२५० |
| सोयाबीन: १२.५० क्विंटल | ३,८२५ | ४,००० | ३,९०६ |
| हरभरा: १७९.५० क्विंटल | ३,९५० | ४,१०१ | ४,०६३ |

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर; पुढील सुनावणी महिन्याभराने

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत मंगळवारी सुनावणी झाली. राज्यात गेल्या ३ ते ४ वर्षांपासून महापालिका आणि जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका रखडल्या आहेत. कोरोना आणि ओबीसी आरक्षणाबाबत रखडलेल्या याचिकेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडत आहेत. या निवडणुकांबाबत कोर्टात अनेक दिवसांपासून सुनावणी सुरु आहे. ही सुनावणी अंतिम टप्प्यात आली आहे. मंगळवारी (ता.२८) निकाल लागणे अपेक्षित होते. परंतु कोर्टाने पुढील**



तारीख २५ फेब्रुवारीची दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुप्रीम कोर्टात मंगळवारी दुपारनंतर सुनावणी पार पडली. संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या या सुनावणीमुळे अनेकांचा भ्रमनिरास झाला आहे. दरम्यान, सुप्रीम पान २ वर

### आता निवडणुका थेट सप्टेंबर- ऑक्टोबरमध्ये

प्रभाग रचना करणे, त्यावर हरकती- सूचनांची प्रक्रिया आणि अंतिम प्रभाग रचना यासाठी किमान ९० दिवसांचा कालावधी लागतो. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात जानेवारी अखेरपर्यंत निवडणुकांसंदर्भात निकाल न लागल्यास एप्रिल-मे महिन्यात निवडणुका घेणे शक्य होणार नाही. त्यामुळे या निवडणुका थेट सप्टेंबर-ऑक्टोबरमध्येच घ्याव्या लागतील, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते.

### निवडणुका घेण्यासाठी याचिका

महापालिका निवडणुकांसाठी पुण्यातील याचीकाकर्त्यांकडून सर्वोच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल केली आहे. पुणे, पिंपरी, नागपूरसह अन्य महापालिकांमध्ये नागरी समस्यांबाबत आमच्या संस्थेकडे अनेक तक्रारी दाखल झाल्या असल्याचे याचिकेमध्ये म्हटले आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने, प्रशासकीय कर्मचारी लोकांच्या हिताकडे लक्ष दिले जात नाही. त्यामुळे आम्ही निवडणूक घेण्याची मागणी केली आहे, असे याचिकाकर्त्यांने सांगितले.

cmyk

## अग्रलेख

# काँग्रेसच्या लढ्याला बळ मिळणार का?

काँग्रेसने राष्ट्रीय मतदार दिनाच्या निमित्ताने निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात राज्यभर आंदोलन केले, काही वर्षापूर्वी काँग्रेसने एखादा कार्यक्रम किंवा अभियानाची घोषणा केली तर त्याचे पडसाद हे राज्यभरात उमटत होते. मात्र काँग्रेसमध्ये आलेली मरगळ, महत्त्वाच्या नेत्यांनी केलेला पक्षत्याग यामुळे आता काँग्रेसची भूमिका ही सर्वसामान्य लोकांपर्यत कुठे तरी पोहचत नाही. महाविकास आघाडीची भूमिका हीच काँग्रेसची भूमिका आत्तापर्यत राहीली होती. आत्ता मात्र काँग्रेसने निवडणूक निकालाविरोधात न्यायालयीन संघर्षाचा आवाज उठविला आहे. लोकसभेला महाराष्ट्रात १३ जागांवर विजय मिळालेल्या काँग्रेसला विधानसभेला अवघ्या १० जागांवर रोखण्यात आले. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या मविआच्या १०० पराभूत उमेदवारांनी राज्यातील विविध न्यायालयात याचिका दाखल केल्या आहेत.

लोकसभा निकालानंतर विधानसभा निवडणूक निकालात सगळ्यात मोठा फटका कोणाला बसला असेल तर तो काँग्रेसला. निवडणुकीच्या निकालाआधी काँग्रेसमधील वजनदार नेते मुख्यमंत्री पदाचे स्वप्न पाहत होते, तर काही नेते महत्त्वाची खाती आपल्याकडेच राहतील या आविर्भावात होते, या सगळ्या नेत्यांना निकालाने क्षणात जमिनीवर आणले. लोकसभा निकालानंतर राज्यातील ४८ पैकी १३ जागा जिंकताना भाजपला मागे सारणाऱ्या काँग्रेसचा आत्मविश्वास इतका वाढला की, थेट मुख्यमंत्री पदाचा उमेदवार कोण ही चर्चाच काँग्रेसमध्ये सुरू झाली, याचा परिणाम महाविकास आघाडीवर झाल्याचे कुठे तरी पहायला मिळाले. काँग्रेसमध्ये विधानसभा निवडणूक निकालानंतर आलेली मरगळ अद्याप दूर झालेली नाही. राष्ट्रीय पातळीवरून दिलेला कार्यक्रम राबिवणे हाच राज्यातील काँग्रेसचा अजेंडा पहायला मिळत आहे. काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीमुळे १६ आमदार असलेल्या काँग्रेसने अद्याप विधीमंडळ गटनेता निवडलेला नाही. त्यातच गेल्या आठवड्यात काँग्रेसचे ५ आमदार एकनाथ शिंदे यांना भेटुन गेल्याचा दावा दावोसमधून उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला. काँग्रेसपक्ष राज्याच्या राजकारणात कुठे तरी बाजुला पडत असल्याचे दिसत आहे. १६ आमदारांचा विचार केला तर त्यात मुंबईतील तीन पारंपारीक जागा, तर विजय वडेट्टीवार, नाना पटोले, विश्वजित कदम, अमित देशमुख, डॉ. नितीन राऊत, अमित झनक या प्रस्थापित आमदारांचा विचार करता, काँग्रेसच्या नवीन नेतृत्वाला टिकवण्याचे मोठे आव्हान काँग्रेससमोर असणार आहे. त्यातच आता महाविकास आघाडीतील शिवसेना आणि समाजवादी पक्ष या दोन पक्षांनी स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतल्याने आता काँग्रेससमोर आपला पारंपारिक मतदार पुन्हा स्वत:कडे वळविण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागणार आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर इव्हिएमबाबत प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले, मारकरवाडी (ता.माळशिरस, जि.सोलापूर ) येथील आंदोलन समोर आले. या आंदोलनाला जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर मोठी हवा मिळाली. मात्र त्यानंतर बीडच्या प्रकरणानंतर इव्हिएमचा विषय मागे पडला. आता पुन्हा एकदा काँग्रेसने राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य साधत राज्यभर आंदोलन केले. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत ४८ लाख मतदार अधिक वाढले आहेत. विशेष म्हणजे २०१९ लोकसभा निवडणूक ते २०२४ ची लोकसभा निवडणूक या पाच वर्षात ३२ लाख मतदार वाढले तर मग अवघ्या सहा महिन्यात ४८ लाख मतदार कसे वाढले तसेच मतदानाच्या दिवशी २० नोव्हेंबरला झालेले मतदान आणि २१ नोव्हेंबर रोजी दुपारी तीन वाजता ६६.०५ टक्के मतदान झाल्याचे अधिकृत जाहिर करण्यात आले. यात ७६ लाख मतदान कसे वाढले, कोणत्या मतदार संघात संध्याकाळी पाच नंतर मोठ्या रांगा होत्या. त्याचे व्हिडीओ चित्रिकरण सादर करा, अशी मागणी काँग्रेसच्या नेत्यांनी निवडणूक आयोगाकडे केली. मात्र आयोगाकडून ठोस उत्तर न मिळाल्याने आता निवडणूक याचिकेतून प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर १३२ विधानसभा मतदारसंघात प्रत्येकी २० ते २५ हजार नवीन मतदारांची नावे समाविष्ट करण्यात आली. लोकसभेला यातील ६२ विधानसभा मतदारसंघात महायुती आघाडीवर होती पण विधानसभेला याच १३२ मतदारसंघातून ११२ जागी महायुतीचा विजय झाला. याबाबतही काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे माहिती मागितली आहे. विधानसभा निवडणूक निकालानंतर इव्हीएम निकालाविरोधात झालेले आंदोलन हा महाविकास आघाडीचा कार्यक्रम होता, मात्र आता शिवसेना हिंदुत्वाच्या मुद्यावर पुन्हा भाजप विरोधात आक्रमक झाली आहे. तर शरद पवार यांनी देखील मधल्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या समर्पित कार्यकर्त्यांचे तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे केलेल्या कौतुकामुळे आता निवडणूक आयोगाविरोधातील काँग्रेसच्या लढ्याला बळ मिळणार का? हा मोठा प्रश्न आहे.

## विकासासाठी सर्व पक्षाला न्याय देण्याचा प्रयत्न करू - पालकमंत्री पंकजा मुंडे



**जालना । प्रतिनिधी**

राज्याच्या पर्यावरण मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंढे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात सदिच्छा भेट दिली. विकासाच्या बाबतीत सर्वच पक्षाला न्याय देण्याचा आपला प्रयत्न राहिल असे प्रतिपादन यावेळी ना. मुंढे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. अरविंदराव चव्हाण यांनी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने पालकमंत्री पंकजा मुंढे यांचे स्वागत केले. या कार्यक्रमास आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे, भाजपचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, बळीराम कडपे,शकुंतला कदम, पुष्पाताई चव्हाण, ज्ञानेश्वर सरकटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना ना. पंकजा मुंढे म्हणाल्या की, तीन बलाढ्य पक्ष महायुतीमध्ये सोबत आहे त्यामुळे विकास करण्यास कोणी रोखू शकत नाही, सर्वांना न्याय मिळेल, संविधानिक कामे सोबत घेऊन करणार आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण म्हणाले की, जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महायुती म्हणून विकास कामात सहभागी करून घ्यावे अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. आपण ही कार्यकर्त्यांच्या भावना समजून विकासाच्या कामात बरोबरीने न्याय दयाल असा आम्हाला विश्वास आहे असे ते म्हणाले.

## राज्य मीडिया प्रमुखपदी अरूण राठोड यांची निवड

मंठा । प्रतिनिधी



तालुक्यातील तळणी येथील अरूण राठोड यांची राष्ट्रीय बंजरा विकास मिशन भारत संघटनेच्या राज्य मीडिया प्रमुखपदी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष देवराव राठोड यांनी निवड केली.

आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन सन्मानित केले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष बळीराम राठोड, महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष दतू जाधव, महिला प्रदेशाध्यक्ष सो. सविता चव्हाण,कार्यकारी अध्यक्ष अमोल चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष गुलबदास चव्हाण, मराठवाडा महासचिव वैजिनाथ जाधव यांचीही उपस्थिती होती. अरूण राठोड यांच्या निवडीमुळे बंजारा समाज देशात २६ उप नावाने विभागलेला असून देशात बजारा समाजाला अलग अलग नावाने अलग अलग कॅटेगरीत असल्याने बंजारा समाजाचा विकास झालेला नाही.म्हणून राष्ट्रीय बंजारा विकास मिशन २०१४ पासून श्री देवराव राठोड बंजारा यांचे नेतृत्वात भारत सरकारशी संघर्ष करीत आहेत. महाराष्ट्र राज्यात आदिवासी आरक्षण श्रेणीत समावेशासाठी महाराष्ट्र राज्यात संघटना मजबूत करण्यासाठी आपल्याला राज्य मिडीया प्रमुख या पदावर नियुक्त केले जात आहे. आपण आपल्याला जिल्ह्यात, राज्यात तांडा-तांड्यात संघटना मजबुत करावी, संघटनेने दिलेल्या जबाबदारीस आपण विश्वासास पात्र आहातच यात काही शंका नाही, आपणास दिलेल्या जबाबदारीस आपण खंबीर पणे लढा देऊन आपण समाजाला न्याय हक्का मोठा लढा द्यालच असेही नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. या निवडीबद्दल पत्रकार अरूण राठोड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## मेडिकल असोसिएशनकडून रक्तदान शिबिर




**मंठा । प्रतिनिधी**

**मेडिकल असोसिएशन तर्फे महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन अध्यक्ष केमिस्ट हृदय सम्राट माननीय आमदार जगन्नाथआप्पा शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त देशव्यापी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.**

शिबिराचे उद्घाटन डॉ ए डी बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष श्याम काकडे, सुनील बोडखे व डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ बी. जे. काळे, डॉ नारायण निकम, डॉ सीमाताई बागवे, डॉ अमरसिंह निर्वळ, ज्येष्ठ केमिस्ट संजयजी छल्लानी, दत्तप्रसादजी झवर, माऊली रामपूरकर, महेश देशपांडे, शिरीष बोराडे, अमोल बोराडे, विशाल सोनटक्के, मोरेश्वर बोराडे, सचिन नरवडे, मानसिंग बोराडे, सिद्धू चव्हाण, अमोल वीरकर, पप्पू नागरे, गोपाल भावसार, जितेश भडागे, हनुमान चंदेल, अमोल राऊत, अमोल वाघ, सचिन मानवतकर, समाधान खरात, सोमेश्वर केसकर, कैलास शेळके, विक्रम राठोड, विकी राठोड, संदीप पवार, गोपाल दायमा, अजय गणगे, राम घोडके, गोविंद काळे यावेळी ५० पेक्षा जास्त रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांचे रक्त संकलन जनकल्याण रक्तपेढी जालना यांनी केले.

# वृत्त वाहिन्याच्या धर्तीवर रंगला रौप्यमहोत्सवी बालझुंबड-२०२५ चा बक्षीस वितरण सोहळा

## विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्तिथीत विजेत्यांना झाले बक्षीस वितरण

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने सलग २५ व्या वर्षी आयोजित रौप्य महोत्सवी बालझुंबड-२०२५, आनंदोत्सव विद्यार्थ्यांचा या कार्यक्रमाचा बक्षीस वितरण सोहळा आज रविवार दि २६ जानेवारी रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाला . या उपक्रमाचे हे सलग पंचवीसावे वर्ष असल्याने हा रौप्यमहोत्सवी असा बक्षीस वितरण सोहळा वृत्त वाहिन्यांच्या पुरस्कार सोहळ्याच्या धर्तीवरच संपन्न करण्यात आला. या सोहळ्याला विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते .**



बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व साने गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी श्रीमती सुरेखा सिरसाट, डॉ पाटील,संकेत मोदी, दिनकर जोशी, दिनेश भराडीया, संकाये अप्पा, सुधाकर टेकाळे यांच्यासह सचिन जाधव हे उपस्थित होते. या स्पर्धेत इयत्ता १ली ते ४ थि, ५ वी ते ७ वी , तसेच ८ वी ते १० वी असे तीन गट तयार करण्यात आले होते .ज्यामध्ये पीपीटी स्पर्धेत ५ वी ते ७ वी या गटातून न्यू व्हिजन स्कुलच्या विश्वजित भागवत चाटे, चि अथर्व सुरेश गायकवाड या विद्यार्थ्यांचा प्रथम ,चि प्रणव प्रल्हाद फड , चि विनायक गंगाधर अकलोड यांचा द्वितीय तर कु समृद्धी अर्जुन पवार, चि कार्तिक नंदकिशोर चिताडे या विद्यार्थ्यांनी तृतीय क्रमांक पटकावला . क्विझ कॉम्पिटीशन स्पर्धेत इयत्ता ८ वी ते १० वी गटातून प्रथम क्रमांक न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या चि शिवेन्द्र सिन्हा, कु आदिती लोमटे यांनी मिळवला ते व्दितीय क्रमांक स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिराच्या सार्थक अंबाड, श्रेयस स्वामी तर तृतीय क्रमांक वसंतराव काळे पब्लिक स्कुलचे नितीशा नरेंद्र काळे, नैतिक नरेंद्र काळे या विद्यार्थ्यांनी मिळवला.तर इयत्ता ५वी ते ७वी गटातून स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिरचे विद्यार्थी चि यश अमोल राडीकर, हर्ष प्रसन्न दिग्रस्कर, तर द्वितीय श्रेणीतन्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे विद्यार्थी कु रिद्धी सचिन शास्त्री, चि श्रेयस हनुमंत तर तृतीय क्रमांक पार्थ बाळासाहेब कदम,ईशान मकरंद पत्की या विद्यार्थ्यांनी आपले नाव झळकावले . वैयक्तिक नृत्य स्पर्धेत इयत्ता १ली ते ४ ठी गटातून प्रथम क्रमांक कु मानवी प्रभाकर पतंगे, द्वितीय कु स्वरा स्वप्नील यादव,तर तृतीय क्रमांक कु काव्या किशोर मोटे या विद्यार्थ्यांनी मिळवला . वैयक्तिक नृत्य स्पर्धेत इयत्ता ५वी ते ७ वी गटातून प्रथम क्रमांक अंशुल गिरीश बिडवे, द्वितीय कु स्वरनिका नरेंद्र वांजरखेडकर तर तृतीय क्रमांक वसुंधरा प्रकाश काशीद या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. इयत्ता ८ वी ते १० वी गटातून प्रथम क्रमांक रणवीर चंद्रकांत देशमुख, सिद्धता राजेश जाधव द्वितीय क्रमांक तर तृतीय क्रमांक विराज परेश वाघडोळे या विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवले.रंगभरण स्पर्धेत १ते४ गटातून कु आराध्या प्रभाकर मुंडे,रमणी शैलेश बाकळे प्रथम तर द्वितीय श्रीनिधी देशमाने, सई योगेश कुलकर्णी त्याचबरोबर तृतीय क्रमांक शंभूराजे बाबासाहेब देशमुख, कु जागृती गौरव लामतुरे या विद्यार्थ्यांनी आपले व आपल्या शाळेचे नाव चमकवले. इयत्ता ५वी ७वी गटात चि अभंग गणेश कदम, आयुष श्रीकृष्ण गोरे,अर्जुन तुकाराम राजुरे ८वी ते १० वी या गटातून चि रितेश लक्ष्मण काळे,समर्थ संजय व्यवहारे, मृणाल किरण कुलकर्णी या विद्यार्थ्यांनी बक्षीस मिळवत आपले नाव उज्वल केले . समूह नृत्य स्पर्धेत इयत्ता पहिली ते चौथी गटातून प्रथम क्रमांक प्रमोदजी महाजन इंग्लिश स्कुल , द्वितीय क्रमांक सिनर्जी नॅशनल स्कुल घाटनांदूर तर तृतीय क्रमांक स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर या शाळेतील मुलांच्या समूहाने मिळवला . ५वी ते ७ वी या गटातून प्रथम क्रमांक सिनजी नॅशनल स्कुल , द्वितीय क्रमांक प्रमोदजी महाजन इंग्लिश स्कुल, तृतीय क्रमांक स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर समूहाने समूह नृत्य स्पर्धेत आपल्या शाळेचे नाव उज्वल केले . या बक्षीस वितरण कार्यक्रमात मानवविकास मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या विशेष नृत्याचा विशेष गौरव करण्यात आला. तर इयत्ता ८ वी ते १० वी गटातून प्रथम क्रमांक श्रीमती गोदावरी कुंकुलोळ योगेश्वरी नूतन कन्या विद्यालय, प्रमोदजी महाजन न्यू इंग्लिश स्कुल,तर तृतीय क्रमांकाने न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. या बक्षीस वितरण समारोहात रोटरी क्लबचे धनराज सोळंकी यांच्यासह त्यांचे सहकारी , रॉट्रॅक्ट क्लब, इनरव्हिल क्लबचे सदस्य, योगेश्वरी मल्टिस्टेटचे संचालक सुधाकर टेकाळे, ॲड अनिल लोमटे,अन्वरभाई, शेख मुक्तार , यांच्यासह अन्य संचालक तसेच पंडित हुलगुंडे, प्राचार्य रेंजो आर चंद्रन,अकबर पठाण, शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे विजय रापतवार , विष्णू सरवदे , सचिन जाधव, धम्मा सरवदे, शाकेर काझी, जावेद गवळी, मतीन जरगर यांच्या हस्ते बालझुंबड या स्पर्धेतील सर्व विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरित करण्यात आले. हा रौप्य महोत्सवी सोहळा संपन्न करण्यासाठी बालझुंबड चे समन्वयक राजेश कांबळे, मुख्याध्यापक विनायक मुंजे, आनंद टाकळकर,अप्पा चव्हाण यांच्यासह जोधप्रसादजी मोदी विद्यालय, न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचे शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून...

### राज्यात १ हजारहून

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दुग्धविकास विभागाची बैठक घेत अनेक सूचना केल्या होत्या. यावर अन्न आणि औषध प्रशासनाने दूध विक्रेते, वितरक, डेअरी, दूध संकलन केंद्र येथील पिशवी बंद व सुट्या दुधांचे नमूने घेतले आहेत. या कार्यक्रमानुसार संपूर्ण राज्यात १०० दिवसांमध्ये ५ हजार दुधाचे नमूने घेण्यात येणार आहेत. त्याचाच भाग म्हणून अन्न आणि औषध प्रशासनाने मंगळवारी १ हजार ६७ दुधाचे नमूने घेतले आहेत. दुग्धविभागाने केलेल्या कारवाईमध्ये पिशवी बंद आणि नामांकित कंपन्यांच्या दुधाचे ६८१ नमूने, तर सुट्या दुधाचे ३८६ नमुने घेण्यात आले. या नमुन्यांमध्ये निकृष्ट दर्जाचे, कमी प्रतीचे दूध असल्याचे आढळून आल्यास संबंधितांविरोधात कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनातील अधिकाऱ्याकडून देण्यात आली.

---------

### धनंजय मुंडेंचा

मात्र त्यांना नागपूरला जायचे असल्याने ही भेट तेव्हा होऊ शकली नाही. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मला अँटी चेंबरमध्ये बोलवले आणि आम्ही त्या अनुषंगाने चर्चा केली. यात मुख्यमंत्र्यांनी मला सांगितले की, ज्याप्रमाणे अंजली दमानिया तुम्हाला भेटल्या तशाच त्या मला देखील भेटल्या. त्यांनी मलाही काही कागदपत्रे दिली आहेत. मात्र या प्रकारणी जी काही चौकशी सुरू आहे, ज्यामध्ये एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन चौकशी अशी तीन प्रकारे चौकशी सुरू आहे. त्या संदर्भात काय वस्तुस्थिती आहे हे तपासली पाहिजे आणि त्यानंतर या बाबत ठरवले पाहिजे, असे फडणवीस म्हणाले असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. अजित पवार पुढे म्हणाले की, याबाबत मुख्यमंत्री असतील किंवा मी स्वतः असेल आम्ही वेळोवेळी सांगितले आहे की, बीड इथे ज्याप्रकारे निर्घृण हत्या करण्यात आली आहे, त्यात जो कोणी दोषी असेल त्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. दरम्यान, विरोधकांकडून सातत्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनामाची मागणी होत आहे. अशातच अजित पवार यांनी स्वतः आपल्या पदाचा राजीनामाचा दिल्याचाही दाखला दिला जात आहे. यावर बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, माझ्या राजीनामा देण्यामागचे कारण वेगळे होते. मला असाह्य वेदना होत होत्या, त्यामुळे तेव्हा मी माझा राजीनामा दिला होता. या प्रकरणात सध्या चौकशी सुरू आहे. त्यामुळे मी पुन्हा पुन्हा हेच सांगेन की, या प्रकरणात जो कोणी दोषी असेल त्या कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही. कुणीही असले तरी त्यावर कारवाई केली जाईल. असे स्पष्टीकरणही अजित पवार यांनी यावेळी दिले आहे. अजित पवारांच्या या भुमिकेमुळे धनंजय मुंडे यांचा राजिनामा सद्यातरी घेतला जाणार नसल्याचे स्पष्ट होत आहे.

--------

### राखेचा व्यवसाय

पवार स्पष्ट उत्तर देतील. विशेषतः ते उत्तर त्यांनीच द्यावे अशी माझी सुद्धा इच्छा आहे, असे मुंडे म्हणाले.

------------

### मनोज जरांगेंनी पिले ग्लासभर पाणी;

जरांगेंनी २५ जानेवारीपासून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंतरवाली सराटीत उपोषण सुरू केले आहे. मंगळवारी त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस होता. या कालावधीत त्यांनी पाण्याचा थेंबही घेतला नाही. परिणामी त्यांची प्रकृती बिघडत चालली होती. त्यानंतर मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या मातोश्री, मुलगी वैभवी देशमुख व बंधू धनंजय देशमुख यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी या सर्वांनी जरांगेंना पाणी घेण्याची विनंती केली. सुरुवातीला त्यांनी नकार दिला. पण अखेर त्यांच्या विनंतीला मान देत त्यांनी संतोष देशमुख यांच्या आई व मुलीच्या हस्ते पाणी प्राशन केले. त्यांची प्रकृती पाहून देशमुख कुटुंबीयांनाही अश्रू अनावर झाले. विशेष म्हणजे आंतरवाली सराटीत जरांगेसोबत आंदोलन करणाऱ्या इतर काही उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडल्याचाही दावा केला जात आहे.

--------------

### बीड जिल्हा मध्यवर्ती बँके

बूस्टर मिळण्याची अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे. दरम्यान बीड सोबतच नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या देखील विविध विषयांवर याच बैठकीत चर्चा होणार आहे.

--------------

### बेकायदेशीर धर्मांतराचा गुन्हा हत्या, बलात्कार,

आणि उच्च न्यायालयाने जामीन न दिल्याबद्दल आश्चर्यही व्यक्त केले. कानपूर येथील मौलवी सय्यद शाह काझमी उर्फ मोहम्मद शाद यांच्यावर गतीमंद अल्पवयीन मुलाचे बेकायदेशीर धर्मांतर केल्याचा आरोप आहे. त्यांच्यावर आयपीसीच्या कलम ५०४ आणि ५०६ व्यतिरिक्त उत्तर प्रदेश बेकायदेशीर धार्मिक धर्मांतर प्रतिबंधक कायदा, २०२१ च्या कलमांन्वये गुन्हा दाखल झाला. त्यांना अटकही करण्यात आली. कनिष्ठ न्यायालय आणि उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर मौलवी सय्यद शाह काझमी उर्फ मोहम्मद शाद यांनी जामीनासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. हे प्रकरण एका अल्पवयीन मुलाचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याबाबत आहे. त्यामुळे, हे अत्यंत गंभीर आहे. यामध्ये, एखाद्याला १० वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकते, असे उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने युक्तीवाद करताना अतिरिक्त महाधिवक्ता गरिमा प्रसाद यांनी सांगितले. बेकायदेशीररीत्या करण्यात आलेले धर्मांतर हा काही हत्या, बलात्कार किंवा दरोडा इतका गंभीर गुन्हा नाही, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला यांच्या अध्यक्षतेखालील दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने नोंदवले. यावेळी न्यायाधीशांनी उत्तर प्रदेश सरकारच्या वकिलाचे युक्तिवाद फेटाळून लावले. या प्रकरणात याचिकाकर्त्याला कोठडीत ठेवण्याची आवश्यकता आहे असे दिसत नाही. त्यामुळे त्याला जामीन मंजूर करण्यात येत असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

-----------

### पेट्रोल- डिझेल वाहने टप्प्याटप्प्याने

सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने मुंबई शहरातील वाहतूक कोंडी आणि वाढते प्रदूषण आणि जीवनमान, पर्यावरण आणि एकूणच शाश्वततेवर त्याचा नकारात्मक परिणाम याबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली होती. उच्च न्यायालयाने वाहनांमधून होणारे उत्सर्जन हे वायू प्रदूषणाचे एक प्रमुख स्रोत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. तसेच मुंबईतील वाहनांची संख्या आणि प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी सध्याचे उपाय अपुरे पडत असल्याचे नमूद केले होते. डिझेल आणि पेट्रोलवर चालणाऱ्या वाहनांना टप्प्याटप्प्याने बंद करणे ''योग्य किंवा व्यवहार्य'' आहे का याचा सखोल अभ्यास करण्याची गरजही न्यायालयाने अधोरेखित केली होती. त्याची दखल घेत राज्य सरकारने मुंबई महानगर क्षेत्रात पेट्रोल आणि डिझेल वाहनांवर बंदी घालणे. फक्त सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनांना परवानगी देणे शक्य आहे का?, याचा अभ्यास करण्यासाठी आणि अहवाल सादर करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन केली आहे. समितीने वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांना सहकारी सदस्य म्हणून समाविष्ट करण्याचे आणि त्यांच्याकडून अभिप्राय घेण्याचे अधिकार दिले होते. आता ही समिती मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) शेजारील ठाणे, रायगड आणि पालघर जिल्ह्यांमध्येही पेट्रोल- डिझेल वाहने टप्प्याटप्प्याने बंद करण्याबाबत शिफारस करणार आहे.

**समितीमधील सदस्य**

निवृत्त आयएएस अधिकारी सुधीर कुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखालील स्थापन केलेली समिती तीन महिन्यांत शिफारशींसह अहवाल सादर करणार आहे. महाराष्ट्राचे वाहतूक आयुक्त, मुंबईचे संयुक्त पोलिस आयुक्त (वाहतूक), महानगर गॅस लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड (महावितरण) चे प्रकल्प व्यवस्थापक, सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स (सियाम) चे अध्यक्ष आणि संयुक्त वाहतूक आयुक्त (अंमलबजावणी-१) हे समितीचे सदस्य आहेत. ही समिती राज्य सरकारला तीन महिन्यांत शिफारशींसह अहवाल सादर करणार आहे.

-----------

### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका

कोर्टात न्यायमूर्ती सूर्यकांत आणि कोटेश्वर सिंग यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. या सुनावणीकडे राज्यातील प्रत्येक पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह ज्येष्ठ नेत्यांची नजर लागून राहिली होती. परंतु कोर्टाने तब्बल महिनाभर तारीख लांबणीवर टाकल्याने पुन्हा प्रतिक्षा वाढली आहे. प्रभाग रचना, लोकसंख्येत १० टक्के वाढ धरून निश्चित केलेली सदस्यसंख्या आणि ओबीसी आरक्षण यावरून तब्बल ५७ याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. या याचीकेवर एकत्रित सुनावणी होणार होती. ती होऊ शकली नाही.

----------

### ३१ जानेवारीपासून

तर सरकारी कामकाज ४ एप्रिल २०२५ रोजी संपण्याची शक्यता आहे. दरम्यान, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे दोन भाग असणार आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला भाग ३१ जानेवारीला सुरू होईल आणि १३ फेब्रुवारीला संपणार आहे. तर अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा भाग १० मार्चला पासून सुरू होईल आणि ४ एप्रिलला संपणार आहे. ३१ जानेवारी ते १३ फेब्रुवारी या कालावधीत अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या भागात एकूण ९ बैठका होणार आहेत.

-----------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. २९ जानेवारी २०२५



## कुंबेफळ येथील तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी गणेशराव भोसले यांची बिनविरोध निवड



अंबाजोगाई । प्रतिनिधी : तालुक्यातील कुंबेफळ येथील तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षपदी गणेश वसंतराव भोसले यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

रविवार, दिनांक २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी ग्रामपंचायत कार्यालय कुंबेफळ (ता.अंबाजोगाई) यांच्या वतीने श्री मारूती मंदिर येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर ग्रामसभेतून गणेश वसंतराव भोसले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पंचक्रोशीत गणेशराव भोसले यांना आबा या नांवाने सर्वजण ओळखतात. भोसले हे सामाजिक कार्यात सदैव सहभागी व अग्रेसर असतात. एक कुशल संघटक व मितभाषी व्यक्तीमत्व म्हणून ते सुपरिचित आहेत. गणेशराव आबा भोसले यांची निवड बिनविरोध झाल्याने त्यांचे केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ.नमिताताई मुंदडा, ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, अंबाजोगाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती विलासराव सोनवणे, सरपंच लिंगेश्वर तोडकर, उपसरपंच प्रमोद भोसले, माजी अध्यक्ष सुनिल आडसूळ, शिक्षक संतोष गायकवाड आणि कुंबेफळ (ता.अंबाजोगाई) येथील समस्त ग्रामस्थांनी त्यांच्या निवडीचे स्वागत करून पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे -साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या संविधान प्रेमी शहिदाच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी रिपाई नेते विजय दादा साळवे यांनी परभणी ते मुंबई येथे निघालेल्या लाँगमार्च मध्ये आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना प्रतिक्रिया दिली. त्यांच्यासोबत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते लाँग मार्चमध्ये ज्येष्ठ नेते कचरू तात्या खळगे, डॉ. खळगे,अंकुशराव जाधव,पत्रकार किशन भदर्गे, दीपकराव टाकणखार,दिलीपराव मक्सरे, राजकुमार सोनवणे, डी एस साळवे , वडवणीचे उजगरे,प्रकाश खळगे सर इत्यादी सहभागी झाले आहेत याबाबत अधिक माहिती अशी की सोमनाथ सूर्यवंशी हे कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी होते व ते ... च्या परीक्षेची तयारी करीत होते अशा या कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याने कोणतीही दगडफेकी केली नव्हती किंवा कोणत्याही सीसीटीव्ही किंवा व्हिडिओ कॅमेरात ते दिसून आलेले नसतांनाही संविधानाच्या प्रतिमेची मोडतोड करून परभणीत दंगल कडून आणण्याचा प्रयत्न काही जातीवाद्यांनी केला होता व या परभणी शहरांमध्ये जे संविधानाच्या प्रतीकृतीची मोडतोड केली म्हणून परभणी जिल्हा बंद पुकारलेल्या संविधान प्रेमी नागरिकांनी कोणतेही असंवैधानिक काम केले नव्हते परंतु मोडतोड करून भारत देशाशी गद्दारी करणाऱ्यानी संविधानाची मोड तोड करून ज्या लोकांनी परभणी शहरांमध्ये व पर्यायाने महाराष्ट्रभर दंगली घडवून आणण्याचा कट काही जातीवाद्यांनी रचला होता व त्याचाच भाग म्हणून परभणी शहरांमध्ये लोकशाही मार्गाने परभणी जिल्हा बंद चे आव्हान करणाऱ्या आंबेडकर प्रेमी तरुणांवर कोणतेही असंवैधानिक काम न करता परभणी बंदचे आवाहन करीत होते परंतु भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करण्यापूर्वी एक दिवस अगोदर



एक मोर्चा परभणी शहरात निघाला होता व त्या मोर्चामध्ये संविधान विरोधी घोषणा सुद्धा देण्यात आल्या होत्या आणि दुसऱ्याच दिवशी संविधानाची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्या च्या हातात होती त्या संविधानाच्या पुस्तकाची मोडतोड करण्याचे काम एका माथेफिरूनी केले आणि त्या संविधानाची मोडतोड झाली म्हणून लोकशाही मार्गाने व शांततेने परभणी जिल्हा बंद चे आव्हान करणाऱ्या आंबेडकर प्रेमी तरुणांना सोडून काही जातीवादी गुंड पोलिसांची वर्दी घालून व काही गुंड प्रवृत्तीचे लोक मोडतोड दगडफेक करीत असल्याचे षडयंत्र रचून पळून गेले व जे लोकशाही मार्गाने आंबेडकर प्रेमी तरुण परभणी जिल्हा बंदचे आवाहन करीत होते त्यांना कोंबिंग ऑपरेशन करून व आंबेडकरी वस्त्यांमध्ये घुसून काही पोलिसांनी आंबेडकरी तरुणांचे कोंबिंग आपरेशन करून त्यांना बेदम मारहाण करत होते काही आंबेडकरी तरुणांना अशा ठिकाणी निरपराध बौद्ध तरुणांना गाठले की जिथून त्या तरुणांना पळून सुद्धा जाता येणार नाही जसे की जालियनवाला बाग हत्याकांड झाले होते त्याप्रमाणे त्या संविधान प्रेम आंबेडकरी तरुणांना गाठून बेदम मारहाण करीत होते पोलिसांची वर्दी घालून फिरणाऱ्या नकली गुंड पोलिसांनी केवळ निरपराध आंबेडकरी तरुणांचे कोंबिंग ऑपरेशनच केली नाही तर त्यांना बेदम मारहाण करीत आंबेडकरी वस्त्यांवर निर्मनुष्य जागेवर घराच्या बाहेर ज्या घरावर अशोक चक्र आहे व त्या घराच्या बाहेर उभ्या असलेल्या दुचाकी किंवा चार चाकी वाहनांना सुद्धा लाठ्या-काठ्यांनी मोडतोड करीत असल्याचे व्हिडिओ काही तरुणांनी आपल्या मोबाईल मध्ये शूटिंग केले होते अशाच तरुणांना गाठून त्यांचे कोंबिंग आपरेशन करीत त्यांना बेछुटपणे लाठीमार करीत जखमी करत होते आणि अशा निरपराध मुलांना अमानुषपणे मारहाण करीत असताना एका दवाखान्यामध्ये ड्युटी करणाऱ्या मानवते नावाच्या महिलेने तिच्या मोबाईल मध्ये ही शूटिंग घेण्याचा प्रयत्न केल्याचे बघून त्या बाईला केवळ मोबाईल मध्ये शूटिंग केली म्हणून तिला सुद्धा तिच्या केसाला धरून तिला घराबाहेर काढत तिच्यावर सुद्धा लाठी हल्ला केला व तिचा सुद्धा कोणतीही महिला कॉन्स्टेबल नसताना या गुंडांच्या वेशात आलेल्या पोलिसांनी त्या बौद्ध महिलेला फरपटत आणीत व मारहाण करीत लाठी चार्ज करीत पोलीस स्टेशनला म्हणते नेले व तिला आणि त्या निरपराध तरुणांना सुद्धा कोणाचे हात फॅक्चर होईपर्यंत कोणाचा पाय फ्रॅक्चर होईपर्यंत मारहाण केली त्या व्हिडिओ शूटिंग घेणाऱ्या महिलेला तर एवढे मारले की तिला लघवी ला आले असताना सुद्धा ती जेव्हा म्हणत होती की मला लघवीला जायचे आहे मला सोडा लघवीला जाऊ द्या तेव्हा तिला लघवीला तर बाथरूम कडे जाऊ दिले नाहीच उलट तिथे कोणतीही महिला पोलीस कॉन्स्टेबल नसताना त्या महिलेला इथेच लघवी कर असे म्हणत तिच्या गुप्तांगावर लाथा मारत अमानुषपणे तिचा छळ केला व असेच सर्व बौद्ध वस्त्यांतील तरुणांवर लाठीचार्ज करीत कोंबिंग ऑपरेशन करीत त्यांचा अमानुषपणे छळ केला हे अन्याय अत्याचार निरपराध तरुणांवर केले व जे दगडफेक करणारे प्रायोजित दंगल घडविणारे गुंड होते त्यांना मोकळे सोडून दिले एवढेच नव्हे तर एका व्हिडिओमध्ये त्याच गुंड पर्वती प्रवृत्तीचा एक साध्या वेषातला माणूस मारहाण करीत असल्याचे सुद्धा दिसून आलेले आहे असा अनंनवित अत्याचार छळ व अमानुषपणे मारहाण बौद्ध समाजातील आंबेडकरी तरुणांना व महिलांना सुद्धा केलेली आहे त्या अन्यायाच्या विरोधात संबंधितांना गुन्हेगारांना ॲट्रॉसिटी व कठोर शिक्षा करण्यात यावी आणि सोमनाथ सूर्यवंशी च्या मारेकऱ्यांना व त्याला जबाबदार असणाऱ्या जातीवादी पोलिसांवर खूनाचा गुन्हा दाखल करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी या परभणी ते मुंबई चालणाऱ्या पायी लाँग मार्चमध्ये रिपाई नेते विजय दादा साळवे यांनी सरकारकडे मागणी केली परभणी ते मुंबई या लाँगमार्च मध्ये शेकडो बौद्ध आंबेडकर तरुण व महिला भगिनी सहभागी झालेले आहेत.

# चांदापूर येथे २ फेब्रुवारी रोजी ११ व्या धम्म परिषदेचे आयोजन

## धम्म उपासकांनी सहभागी व्हावे – तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण यांचे आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा, मौजे चांदापुर (तिर्थक्षेत्र दर्जा – क प्राप्त) येथे प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी अकराव्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या धम्म परिषदेला अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे कार्याध्यक्ष पुज्य भदन्त डॉ.उपगुप्त महाथेरो (पुर्णा) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या धम्म परिषदेचे उद्धाटक म्हणून पुज्य भिक्खू थेर इम चांग व्वू (मुख्य संस्थापक, बुलम्वांगडोंगजोल विहार, दक्षिण कोरिया) तर विशेष अतिथी म्हणून पुज्य भिक्खू डॉ.लि.ची.रान (माजी कुलगुरू, कोरियन बुध्दीस्ट विद्यापीठ, दक्षिण कोरिया), पुज्य भिक्खू महाविरो थेरो (काळेगाव अहमदपुर), पुज्य भिक्खू धम्मशील थेरो ( शिवणी, बीड) आणि पुज्य भिक्खू पय्यावर्धन (हिंगोली) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी, चांदापुर (परळी वै.) येथे ही धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. या धम्म परिषदेचे सम्यक संकल्प या पेजवरून फेसबुक लाईव्ह थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. याचा लाभ धम्म उपासकांनी घ्यावा असे आवाहन धम्म परिषदेचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर यांनी केले आहे.



तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण, चांदापूर, जेतवन (ता.परळी, जि.बीड) यांच्या वतीने तालुक्यातील चोखामेळा सहकारी सोसायटी, वसंतनगर तांडा, मौजे चांदापूर, ता.परळी येथे रविवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त स्मृतीशेष शंकरराव जगतकर नगरी येथे अकराव्या बौद्ध धम्म परिषदेची सुरूवात सकाळी ९ वाजता पंचरंगी धम्म ध्वजारोहणाने होईल.

या धम्म परीषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनीचे अध्यक्ष ॲड.अनंतराव जगतकर हे असणार आहेत. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय दौंड, माजी लेफ्टनंट कर्नल डॉ.एम.एच.कांबळे तर यावेळी नालंदा अकादमीचे अध्यक्ष चंद्रशेखर वडमारे, सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले, कृषी तज्ज्ञ डॉ.मधुकर खळगे, समाजभूषण आनंद वाघमारे, बौद्धाचार्य आनंद तुपसमुद्रे, मिलिंद नरबागे, श्रावण बनसोडे, महादेव बनसोडे, संग्राम गित्ते (सरपंच, चांदापुर), प्रशांत गित्ते (ग्रा.पं.सदस्य,चांदापूर.), उपमुख्याध्यापक विलास गायकवाड, गोल्ड मेडल प्राप्त वंदना राहुल सुरवसे, बौद्धाचार्य सचिन रणखांबे तसेच प्रसिद्धीप्रमुख प्रा.बालाजी जगतकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, ज्या उपासकांना धम्म परीषदेला उपस्थित रहावयाचे आहे. त्या धम्म उपासकांनी पांढरे वस्त्र परिधान करूनच धम्म परिषदेत सहभागी व्हावे तसेच वसंतनगर तांडा, चांदापूर (ता.परळी वैजेनाथ) या ठिकाणी धम्म परिषदेस येताना पुस – नंदागौळ – वसंतनगर तांडा मार्गेच यावे. असे आवाहन संयोजन समितीने केले आहे. धम्म परिषदेच्या यशस्वितेसाठी तक्षशिला बौद्ध धम्म प्रशिक्षण प्रतिष्ठाण चांदापूर, जेतवन (ता.परळी वै. जि.बीड) चे पदाधिकारी चंद्रकांत इंगळे, प्रा.प्रदीप रोडे, राजेंद्र घोडके, राहुल घोडके, प्रा.गौतम गायकवाड, व्यंकट वाघमारे, सचिन वाघमारे, जगन सरवदे, विश्वनाथ भालेराव, सीमाताई इंगळे, चंद्रकांत बनसोडे, शाहीर गौतम सरवदे, सुरेश कांबळे, किशोर इंगळे, आकाश वेडे, सुशिल इंगळे, नागेश जोंधळे, राहुल सुरवसे, बी.एस.बनसोडे हे प्रयत्न करीत आहेत. तर चांदापुर येथे ११ व्या बौध्द धम्म परीषदे निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमास या विभागातील उपासकांनी मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहन करण्यात आले आहे

# पिक माझं आलंय राखणीला! सोन्याचं घुंगरू गोफणीला!!

### छत्रपती शिवाजी विद्यालयात रंगले कवीसंमेलन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील छत्रपती शिवाजी विद्यालयात सोमवारी (दि.२७) मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त आयोजित कवी शेषनारायण राठोड यांचे कवीसंमेलन चांगलेच रंगले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मनोज सोळंके होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कवी शेषनारायण राठोड यांनी

पीक माझं आलय राखणीला,
सोन्याचं घुंगरू गोफणीला ही कविता सादर केली. त्यानंतर त्यांनी आईची महती सांगणारी कविता

हे आई हे आहे, आधार सावलीचा त्या
माय माऊलीचा ही कविता सादर केली .

काळी ढेकुळली माती



माझ्या आभाळाला दान
असा बरस भुईवर

तुला मातीची रं आण या कवितेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .शेवटी

व्यथा कुणापुढे मांडू
या या बळीराजाची
पोट खपाटीला गेली
राजा सर्जाची

ही दुष्काळाची कविता त्यांनी सादर केली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक मनोज सोळंके यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालासाहेब झोडगे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर पवार यांनी मानले .यावेळी आप्पासाहेब होके, विष्णू गडकर, माधव घोलप, दत्ता इंगळे, मुरलीधर भाळशंकर, अनंत राठोड, अनंत शेजूळ, सय्यद गयास ,फरजाना पठाण, सत्यप्रिया होके पाटील, स्मिता डाके, शिल्पा शिनगारे ,शेख शहाणूर, तुळशीराम साळवे, ज्ञानेश्वर पवार, मिलिंद देशपांडे, दत्ता पांडे, दिनकर काळे ,प्रथमेश लांडगे यांच्यासह सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### बीड रेल्वेस्टेशनला क्रांतीसिंह

मंजुरीचा कसलाही संबंध नसताना अशा नावांसाठी उगाच अट्टाहास का? आणि कशासाठी?

ज्यांचे योगदान आहे त्या महापुरुषांच्या नावासाठी आपण प्रामाणिकपणे आग्रह धरला पाहिजे या मताचा मी सर्वसमावेशक विचाराचा कार्यकर्ता आहे! म्हणून ज्यांनी खरंच बीड रेल्वे पहिल्यांदा मंजूर करुन घेण्यासाठी ज्यांनी संघर्ष केला ते खासदार क्रांतीसिंह नाना पाटलांचे देशाला स्वातंत्र्य मिळवुन देण्यासाठी पराकोटीचा संघर्ष व त्याग आहे.तसेच क्रांतीसिंहांचे व त्यांच्या शुर कन्या क्रांतिविरागणा हौसाक्का पाटील यांचेही हैदराबाद मुक्ति संग्रामात अत्यंत मोलाचे संघर्षमय योगदान आहे ते आम्हा मराठवाड्यातील जनतेला कधापी विसरता येणार नाही.क्रांतीसिंह नाना पाटील बीडचे खासदार असताना ते कधीच गाडीत बसून घेऊन डामडौल करत बीड लोकसभा मतदारसंघात फिरले नाहीत तर ते गावागावात जाऊन लोकांकडून चटणीभाकर घेऊन खात व ग्रामपंचायतीत राहुन त्या त्या गावाचे प्रश्न सोडविण्यासाठी झटत असत एवढेच नव्हे तर ते खासदार असताना पाच वर्षे कधीही स्वतःच्या घरी गेले नाहीत याची इतिहासात नोंद आहे. असे खासदार आजच्या काळात बीड जिल्हयालाच नव्हे तर महाराष्ट्राला मिळणे दुर्दैवी आहे तरी अशा क्रांतीकारी थोर महापुरुषांचे नाव बीड रेल्वे स्टेशनला देऊन आपण त्यांचा गौरव करण्यात यावा असे निवदेनपत्र भाई आकाश निर्मळ यांनी महाराष्ट्र राज्य रेल्वे प्रशासन कार्यालयाकडे दिले आहे.

### एसटी भाडेवाढ विरोधात जिल्हाप्रमुख

सरकारने दिले होते परंतु हे बोलले एक आणि प्रत्यक्षात केले एक सत्तेमध्ये आल्या बरोबरच एसटीच्या भावात पंधरा टक्के वाढ करून सर्वसामान्य जनतेला वेठीस धरण्याचे काम या सरकारने केले आहे अशा निष्काळजी सरकारचा निषेध करुन ही केलेली भाडेवाढ रद्द न केल्यास बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी सातपुते, वरेकर यांनी दिला.याबरोबरच बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभेतील आष्टी येथे तालुकाप्रमुख सुभाषजी राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत,व शिरूर तालुक्यात आजिनाथ खेडकर व तालुका प्रमुख सोपान काका मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत, पाटोदा तालुक्यात तालुका प्रमुख मिकुंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत,धारूर तालुक्यात तालुका प्रमुख बाबा सराफ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने या विरोधात चक्काजाम करून निवेदन देण्यात आले.राज्य शासनाने गोरगरीब जनतेवर लादलेल्या आर्थिक भाडे विरोधात तीव्र निषेध व्यक्त केला. व एसटी भाडेवाढ रद्द झालीच पाहिजे..परिवहन मंत्र्याचा धिक्कार असो..परिवहन मंत्री हाय.. हाय.. सर्वसामान्य जनतेच्या पोटावर पाय देणाऱ्या भाजप सरकारचा धिक्कार असो अशा जोरदार घोषणा देत सदरील निर्णय तातडीने रद्द करण्याची शासनाकडे मागणी केली.यावेळी तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, उपजिल्हाप्रमुख राजाभाऊ महुवाले,महिला आघाडीच्या बीड विधानसभा संघटिका मीराताई नवले, जिल्हा सचिव श्रीकृष्णजी गायके,युवासेना उपजिल्हा युवाधिकारी कृष्णा चौरे,पाटोदा तालुका युवाधिकारी अजिंक्य डोरले,पाटोदा तालुका समन्वयक आकाश कांकरिया,उपतालुका प्रमुख अशोकजी सगळे, उपतालुकाप्रमुख प्रकाशजी धुताडमल, उपतालुकाप्रमुख दादासाहेब सोनवणे, तालुका संघटक कलीम भाई शेख,गणेश डोईफोडे,विनोद गूंड पाटील,दिपक घोडके पाटील,अजय गायकवाड,रमेश नवले,आसाराम वैद्य, भरत खरात,भीमराव कुटे,बाबू कुटे,सुनील शेळके,राजाभाऊ नवले, चंद्रकांत बजगुडे,बीड जिल्हा शिवसेनेचे आजी माजी पदाधिकारी, शिवसैनिक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी स्नेहसंमेलनाची आवश्यकता -डॉ. हेमंत वैद्य

**माजलगाव । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचे संवेदनशील मन तयार करण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलनाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्धाटन प्रसंगी उद्धाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक संकुलाचे कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, प्रमुख पाहुणे प्रसिद्ध कवी संतोष नारायणकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, शशीकिरण गडम, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ, सहप्रमुख प्रा. प्रतिभा जाधव उपस्थित होत्या.

पुढे बोलताना हेमंत वैद्य म्हणाले की, स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी जे यश मिळवलेले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक




कौतुक केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छाही दिल्या. अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संस्काराची बीजे रुजवली जातात असे ते म्हणाले.

याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. आजचे वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे विद्यार्थ्यांचा खास उत्सव आहे पण या उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वास वेगळे पैलू पाडले पाहिजेत. आपल्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी हे स्नेहसंमेलन भविष्यात नक्कीच तुम्हाला उपयोगात येईल असे ते म्हणाले. याप्रसंगी मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपण वर्षभरामध्ये केलेला अभ्यासाचा थकवा घालवण्यासाठी व तुमच्या आयुष्यातील आनंद उत्सव वाढवण्यासाठी हे वार्षिक स्नेहसंमेलन महाविद्यालय आपल्यासाठी आयोजित करत असते. अध्यक्षीय समारोप करताना एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की, अशा वार्षिक स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनास आकार दिला पाहिजे व या माध्यमातून वेगवेगळी कौशल्य आत्मसात करून आपल्या व्यक्तिमत्त्वास योग्य ती दिशा दिली पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्यांनी याप्रसंगी संमेलन आयोजनाची भूमिका स्पष्ट केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विकास बोरगावकर यांनी केले तर आभार स्नेहसंमेलन प्रमुख डॉ. रमेश गटकळ यांनी मानले. या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

पान ६ वरून...

### दिव्यांग शाळेतील

नियोजन करण्यात आलेले आहे. विद्यार्थी निवास व भोजन व्यवस्था अगदी सुलभ रित्या कशी होईल याचीही आखनी यावेळी कारण्यात आली. जिल्ह्याचे वै.सा.का. नखाते साहेब यांनी या कार्यक्रमाचे अचूक नियोजन आखले आहे.जिल्ह्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त यश प्राप्त करून पुढील राज्यस्तरीय दिव्यांगाच्या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्याचे नाव लौकिक करण्याकरिता प्रत्येक शाळेतील क्रीडाशिक्षक यांनी मेहनत घ्यावी अशा सूचना समाजकल्याण अधिकारी यांनी केल्या.या बैठकीसाठी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक आणि क्रीडाशिक्षक हजर होते.

### वचनबध्दता, सातत्य

सामुहिक लोकनृत्य स्पर्धेतील द्वितीय क्रमांक प्राप्त गीतांचे सादरीकरण करण्यात आले. व सर्व सांघिक, वैयक्तिक स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना उदघाटक प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना मुक्त व्यासपीठ म्हणजे विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन होय, विद्यार्थ्यांनी फक्त क्रमिक अभ्यासावर थांबायचे नाही अशा स्नेहसंमेलनातून कलाकार, खेळाडू उदयाला येत असतात. यानंतर या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, वर्तनाचे परिवर्तन म्हणजे खऱ्या अर्थाने शिक्षण होय. मन, मनगट आणि मस्तक यांची मशागत शालेय जीवनात होत असते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्नेहसंमेलन प्रमुख मुकेश काळे यांनी केले, आभार प्रदर्शन विभाग प्रमुख रवींद्र खोडवे, सुत्रसंचलन श्रीमती अंजली वाघमारे, यांनी केले, बक्षीस वाचन स्नेहसंमेलन सहप्रमुख शिरीष देशमुख , पंडित मेंडके यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र प्रभाकर बनसोडे यांनी सांगितला.

### रुपामाता नॅचरल शुगरमुळे

रस्ते होते परतु जमिनीला भाव नव्हता हलक्या जमिनी पिकत नव्हत्या आणि ऊस लावला तर कारखान्यास लवकर जात नव्हता तालुक्यातील कारखाने या भागाकडे दुर्लक्ष करत होते त्यामुळे शेतकऱ्याची आर्थिक नाडी बंद झालेली होती बेरोजगारांची

संख्या दिवसेंदिवस वाढत चालली होती. परंतु रुपामाता कारखान्याच्या रूपाने या भागा मध्ये उद्योग उभा करण्यात आला त्यामुळे शेतकऱ्याच्या अशा पल्लवीत झाल्या शेतकऱ्यांच्या शेताला खूप किमती आल्या ज्या गावात मध्ये दोन लाख रुपये एकर जमिनी कोणीही घेत नव्हते त्या जमिनी आज दहा बारा लाख रुपये ची किंमत सांगत आहेत हे सर्व रूपामाता कारखान्यामुळेच घडले. आमचे स्वप्न साकार होण्यासाठी गुंड परिवारासारखे देवरुपी माणसे भेटले आणि आमच्या गावाचा कायापालट झाला. आज रोशनपुरी या गावांमध्ये सुशिक्षित बेकार शोधून सापडत नाही शेतकऱ्यापासून शेतमजुरा पर्यंत सर्वांनाच आर्थिक प्रगती करण्याची संधी मिळत आहे शेतकऱ्यांचा ऊस वेळेवर जात आहे परंतु ज्याच्यात दोन माणसांच्या हाताला काम देण्याची कुवत नाही असे काही महाभाग रूपामाता कारखान्याला बदनाम करण्याचं काम करत आहेत तमाम शेतकऱ्यांना आव्हान आणि विनंती करतो कुठलिही अडचण असेल तर प्रत्यक्ष स्वतः कारखानच्या कर्मचारी,संचालक, किंवा चेअरमनला विचार भेटा आपली अडचण सांगा आम्ही जमिनी देऊन हा कारखाना उभा केलेला आहे या ठिकाणी आम्ही कुठलेही राजकारण होऊ देणार नाहीत वेळप्रसंगी आम्हाला रस्त्यावर उतरण्याची वेळ आली तरी उतरू परंतु आमच्या गावाला व आमच्या या नावाला डाग लागू देणार नाही महाराष्ट्र नवनिर्माण सेना सदैव रुपामाता कारखान्याच्या पाठीशी उभी राहील कारण आमच्या नेत्याची शिकवण आहे जो काम चांगलं काम करतो त्यांच्या पाठीशी सदैव उभा राहवे भागाचा विकास होत आहे कोणाला आंदोलन करण्यासाठी बाकी इतर ठिकाण आहेत. या कारखान्याने इतर कारखान्याप्रमाणेच वेळेत बिल अदा केलेली आहेत दोन पाच दिवसाचा फरक असेल तरी कोणी परगाव चा कारखाना समजून कारखान्यास अडचण निर्माण करू नये किंवा त्यांना एकट समजू नये असे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका अध्यक्ष धोंडीराम जाधव यांनी केले आहे.

### मराठी पत्रकार परीषदेच्या

सचिव दिपक कैतके, पी.पी.कुलकर्णी, रवी उबाळे, प्रदिप घुमटवार,शिखरचंद बागरेचा, मनोज खांबे, सचिन शिवशेट्टे, अमोल खरे, चंद्रकांत क्षीरसागर, राज्य प्रसिध्दी प्रमुख संदीप कुलकर्णी, सहायक राज्य प्रसिध्दी प्रमुख भरत निगडे, राज्य महिला आघाडी प्रमुख शोभा जयपूरकर, डीजीटल मिडिया परिषदेचे राज्यप्रमुख अनिल वाघमारे, डीजीटल मिडिया परिषद कार्याध्यक्ष सनी शिंदे, डीजीटल मिडिया प्रमुख परिषद उपाध्यक्ष अनिल उंबरकर आदींची प्रमूख उपस्थिती राहणार आहे.या मेळाव्यास बीड जिल्हयातील पत्रकार बांधवांनी सेलू येथे सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहून परिषदेने आयोजित केलेल्या एकता रॅलीस सहभागी व्हावे असे आवाहन बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेचे राज्य का. सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे यांनी केले आहे.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान

उपस्थित रहावे असे आवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत ह.भ.प. दत्तात्रय महाराज गिरी यांनी केले आहे.या सप्ताहात गाथा भजन नेतृत्व सुदाम म. गवारे, अभिमन्यु म. गिरी, रामेश्वर म.चव्हाण, शिवाजी म.भोसले, श्रीराम म. पांगरे, पांडुरंग म.जाधव यांचे आहे. तसेच महाराष्ट्रातील ख्यातनाम किर्तनकारांची किर्तनसेवा होणार आहे. यामध्ये बुधवार दि.२९ जानेवारी रोजी दिनेश महाराज माने , गुरुवार दि.३० रोजी भरत महाराज जोगी , शुक्रवार दि.३१ रोजी चंद्रकांत महाराज खळेकर , शनिवार दि.०१ फेब्रुवारी जनार्दन महाराज आरावेकर , रविवार दि.२ रोजी ज्ञानेश्वर महाराज जळकेकर , सोमवार दि.३ रोजी माऊली महाराज खडकवाडीकर, मंगळवार दि.४ रोजी महादेव महाराज राऊत ,तर बुधवार दि.५ फेब्रुवारी रोजी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत गुरुवर्य ह.भ.प.श्री दत्तात्रय महाराज गिरी यांचे दुपारी १ ते ३ या वेळेत अमृततुल्य काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.तरी भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन महंत दत्तात्रय महाराज गिरी व व्यवस्थापक पंचक्रोशी परिसर श्री.क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, कुंभेजळगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

ख्यातनाम भजन सम्राट यांच्या उपस्थितीत रंगणार संगीत भजन

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान, येथे सप्ताहात ख्यातनाम कीर्तनकार, भजन सम्राट, गायक, वादक यांची हजेरी असते तर यावर्षी बुधवारी

पांडुरंग म. गोळेगावकर , सुवर्णाताई गिरी ,वैजनाथ कोकाटे , सुदर्शन खरात , गुरुवारी संगीतरत्न गोदावरीताई मुंढे , हरी भोसले, श्रीराम महाराज पागरे, शुक्रवारी भजन सम्राट राहुल खरे, शनिवारी संगीतरत्न कृष्णा म. ठाकर, तबलासाथ पवन उदे , रविवारी गानसम्राज्ञी भाग्यश्री देशपांडे , सोमवारी भजन सम्राट महेश कंठे, तबलासाथ कौस्तुभ तळेकर तर मंगळवारी संगीतरत्न डॉ.निरज लांडे यांच्यासह पंचक्रोशीतील भजनी मंडळ यांच्या उपस्थितीत सात दिवस संगीत भजन कार्यक्रम होणार आहे.

रामायणाचार्य जनार्दन महाराज अरावेकर यांची रामकथा

जीवनातील प्रत्येक प्रश्नाचे उत्तर रामकथेत मिळते म्हणून महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामायणाचार्य संगीत तुळशी रामकथा प्रवक्ते जनार्दन महाराज अरावेकर यांच्या सुमधूर वाणीतून दि.२९ जानेवारी ते दि.४ फेब्रुवारी दरम्यान सकाळी १० ते १ या वेळेत येथे सात दिवस संगीत तुळशी रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी भाविकांनी संगीत तुळशी रामकथेच्या श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# ३ लाख शेतकऱ्यांचे ३८६ कोटी लालफितीत अडकले

## विदर्भातील ५ जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्तांना नुकसान भरपाई कधी?

यवतमाळ : एकीकडे कोट्यवधी रुपयांची दाओसमध्ये गुंतवणूक करीत असलेले सरकार शेतकऱ्यांकडे () मात्र दुर्लक्ष करीत आहे का? असा सवाल विचारण्याची वेळ विदर्भातील शेतकऱ्यांवर आली आहे. त्याचे कारण म्हणजे ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात अमरावती विभागात अतिवृष्टीने हजारो हेक्टर क्षेत्रावरील पिकांची माती झाली. यात सुपीक जमीन अक्षरशः खरडून गेलीय. त्यामुळे शेतकरी पुरता कोलमडलाय. दरम्यान, तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी बधितांचे अश्रू पुसले, तातडीने मदत देण्याचे आश्वासनही दिल. त्यानंतर शासन दरबारी मदत निधीचे प्रस्ताव ही गेले. मात्र, पाच महिने लोटले तरी मदतीचा प्रस्ताव लालफीतशाहीत अडकून पडला आहे. त्यामुळे बळीराजा पुरता हवालदिल झाला असून अतिवृष्टीग्रस्थांना ही नुकसान भरपाई नेमकी कधी मिळणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

विदर्भातील ५ जिल्ह्यातील अतिवृष्टीग्रस्थांना नुकसान भरपाई कधी?

गेल्या ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीत यवतमाळ, वाशीम, अकोला, बुलढाणा अमरावती या पाचही जिल्ह्यातील ३ लाख २३ जहर ८९ शेतकऱ्यांची २ लाख ८० हजार ६४१ हेक्टर



क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले. नुकसानी भरपाईपोटी ३८६ कोटी २३ लाख ४८ हजार रुपयांचा प्रस्ताव अद्यापही मंजूर झाला नाही. आज पाच महिने लोटले तरी हा निधीचा प्रस्ताव बासनात बांधून आहे. सरकार आपल्याच राजकारणात मशगुल आहे. अशी टीका करत सरकारने रखडलेली अतिवृष्टीग्रस्थांची नुकसानी लवकरात लवकर मिळवून देत शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. महायुतीने शेतकऱ्यांना दिलेला शब्द अद्याप पाळला नाही- विजय वेडेट्टीवार विधानसभेची निवडणूक आटोपून मंत्रिमंडळाची स्थापना झाली. परंतु, महायुती शासनाने शेतकऱ्यांना मदतीचा दिलेला शब्द अजूनपर्यंत पाळला नाही.

लाडक्या बहिणीला मदती मानधन कधी मिळेल याची माहिती सरकार देत आहे. पण शेतकरी आपल्या शेतात झालेल्या नैसर्गिक आपत्तीच्या नुकसानीची मदत कधी मिळेल याकडे आता आस लावून बसले आहे. ही मदत नेमकी कधी मिळणार हे सरकारने स्पष्ट करावे, अशी मागणी करत काँग्रेस नेते विजय वेडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली आहे.

शेतकऱ्यांचा रास्ता रोखो आंदोलन

यवतमाळच्या दिग्रस तालुक्यातील गांधीनगर फाटा इथे शेतकऱ्यांनी सरसकट कर्जमाफी, स्वामीनाथन आयोग लागु करा, शेतमालावर आधारित भाव ठरविण्याचा अधिकार मिळावे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकविमा त्वरीत मिळावा या मागणीसाठी दारव्हा-दिग्रस महामार्ग रोखून धरण्यात आला. दरम्यान शेतकऱ्यांच्या रास्तारोको आंदोलनाचा फटका वाहन चालकांना बसला. यावेळी सरकार विरोधात आंदोलक शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

# वराह पालनाचा व्यवसाय फायदेशीर; कमी वेळेत लाखोंची कमाई

गाई-म्हशी, मेंढ्या, कुक्कुटपालनाबरोबरच डुक्कर पालनाची पद्धतही भारतात खूप वाढली आहे. डुक्कर पालन हा लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी फायदेशीर व्यवसाय ठरत आहे. केवळ भारतातच नव्हे तर जगभरात डुकराच्या मांसाची मागणी सर्वाधिक आहे. हे उत्पादने आणि औषधांमध्ये वापरले जाते.


डुकराच्या मांसामध्ये भरपूर प्रथिने असतात. यामुळेच भारतातील शेतकरी डुक्कर पालनाकडे वळले आहेत. तुम्हालाही कमी खर्चात जास्त नफा मिळवायचा असेल तर तुम्ही डुक्कर पालन सुरू करू शकता. डुक्कर पालनाची संपूर्ण माहिती जाणून घेऊया. व्यावसायिकदृष्ट्या डुक्कर पालनासाठी मोठे शेत आवश्यक आहे. ज्यामध्ये हवा, पाणी, प्रकाश यांची योग्य व्यवस्था आहे. नर, मादी आणि शावकांसाठी स्वतंत्र बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. डुक्कर हा पाणीप्रेमी प्राणी आहे. त्याच्या लागवडीसाठी दमट हवामान आवश्यक आहे. १५ ते ३० अंश सेंटीग्रेड तापमान खूपच अनुकूल आहे. डुकरांसाठी तलावासारखे आवारही तयार करण्यात आले आहे. डुकरांच्या चाऱ्यासाठी खूप पैसे खर्च करण्याची गरज नाही.

राज्यात ५ हजार बायोगॅस उभारणार, अनुदानात झाली वाढ : डुकरे शिळे, धान्य, चारा, कचरा,



भाजीपाला, कुजलेले अन्न मोठ्या उत्साहाने खातात. परंतु गरोदर आणि शावकांच्या योग्य विकासासाठी अधिक प्रथिनेयुक्त अन्न आवश्यक आहे, यासाठी कॉर्न, शेंगदाणा पेंड, गव्हाचा कोंडा, फिश पावडर, जीवनसत्त्वे, खनिज क्षार आणि मीठ यांचे मिश्रण दिले जाऊ शकते. डुकरांच्या अनेक जाती आढळतात. ज्यामध्ये व्हाईट यॉर्कशायर, लँड्रेस, हॅम्पशायर, ड्युरोक आणि घुंगरू या संकरित जाती आहेत. यामध्ये घुंगरू जातीच्या भाज्यांचा विकास झपाट्याने होतो. त्यांचा रंग काळा आणि त्वचा जाड असते. व्हाईट यॉर्कशायर ही प्रजननाच्या दृष्टीने प्रगत जात आहे. ती एकावेळी ६ ते ७ शावकांना जन्म देते. त्याच्या नर डुकरांचे वजन ३००-४०० किलो आणि मादी डुकरांचे वजन २३०-३२० किलो पर्यंत असते. हॅम्पशायरची जात मांस व्यवसायासाठी चांगली आहे. लँडरेस ही जात पुनरुत्पादनाच्या दृष्टीने चांगली आहे. सरकार डुक्कर पालनासाठी अनेक योजना राबवत आहे, ज्या अंतर्गत अनुदान दिले जाते. डुक्कर पालनासाठी बँकेकडून कर्जही घेता येते. तुम्ही पशुधन अधिकारी किंवा कृषी विज्ञान केंद्राशी संपर्क साधून योजनांची माहिती आणि लाभ मिळवू शकता.

# ऊस खोडवा व्यवस्थापन



महाराष्ट्रामध्ये ऊस पिकाखालील क्षेत्र जवळजवळ १०-१२ लाख हेक्टर असते तसेच दर हेक्टरी उत्पादकता ८०-९० टन दरम्यान दिसून येते. राज्याची दर हेक्टरी उत्पादकता ही फारच कमी दिसून येते. त्याचे प्रमुख कारण म्हणजे खोडवा पिकाचे कमी उत्पादन हे आहे. कारण राज्यातील एकूण ऊस क्षेत्रापैकी ४० टक्के क्षेत्र खोडव्याचे आहे. मात्र एकूण उत्पादनात खोडव्याचा हिस्सा फक्त २० ते २५ टक्के इतकाच आहे. म्हणून ऊस पिकाचे सरासरी प्रति हेक्टरी उत्पादन वाढविण्यासाठी लागणीच्या ऊसाइतकेच खोडवा पिकास महत्व देणे आवश्यक आहे. परंतु खोडवा व्यवस्थापनाकडे पाहिजे त्या पध्दतीने लक्ष न दिल्याने खोडव्याची उत्पादकता कमी झाल्याचे दिसून येते. खोडवा पिकाची जोपासना आधुनिक तंत्राने केल्यास खोडव्याचे उत्पादन लागणीच्या ऊसा इतकेच येऊ शकते, किंबहुना त्याहीपेक्षा जास्त येऊ शकते, असे मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगांव येथील संशोधनावरुन दिसून आले आहे.


ऊस पाचटमध्ये उत्तम कर्ब : उसाच्या पाचटामध्ये ०.५ टक्के नत्र, ०.२ टक्के स्फुरद आणि ०.७ ते १ टक्के पालाश असते आणि ३२ ते ४० टक्के सेंद्रिय कर्ब असते. असे पाचट जाळल्यास त्यातील सेंद्रिय कर्बाचा पूर्णतः नाश होतो. पाचटातील नत्र आणि स्फुरदाचा ९० टक्केहून अधिक भाग जळून जातो. केवळ पालाश काही प्रमाणात शिल्लक राहते. या सर्व बाबींचा विचार करुन पाचटाचा खोडव्यामध्ये वापर करण्याच्या दृष्टीने प्रयोग घेण्यात आले. त्यात असे आढळून आले की, एक हेक्टर क्षेत्रामधून ८ ते १० टन पाचट मिळते आणि त्यापासून ४० ते ५० किलो नत्र, २० ते ३० किलो स्फुरद, ७५ ते १०० किलो पालाश आणि ३ ते ४ हजार किलो सेंद्रिय कर्ब जमिनीत घातले जाते. महाराष्ट्रामध्ये घेतल्या जाणाऱ्या खोडवा पिकामध्ये पाचटाचा वापर मात्र २ टक्के क्षेत्रावरही होत नाही. हे थांबविण्यासाठी खोडव्यात पाचट, सुरुवातीच्या कालावधीमध्ये आच्छादन म्हणून आणि नंतर ह्याच पाचटाचे जागेवरच चांगले सेंद्रिय खत तयार करण्याचे तंत्र विकसित झाले आहे. शेतकऱ्यांनी पाचट न जाळता खोडव्यामध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचा पुनश्चः वापर करुन खोडवा व्यवस्थापन करावे. त्यामुळे खोडव्याचे उत्पादनात वाढ होतेच शिवाय जमिनीची सर्व प्रकारची सुपिकता व उत्पादकता देखील वाढते.

# जीवाणू खते-पीक संरक्षण व उत्पादन वाढीसाठी किफायतशीर आणि परिणामकारक पर्याय

रासायनिक खताची कमतरता आणि वाढलेल्या किंमती यामुळे पिकांचे उत्पादन खर्च तर वाढतातच शिवाय अतिरिक्त रसायनांच्या वापरामुळे पिकांचे सुद्धा नुकसान होते. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून अपेक्षित उत्पादन मिळवायचे असल्यास जीवाणू खते हा अतिशय किफायतशीर आणि परिणामकारक पर्याय सध्या उपलब्ध आहे.

जीवाणू खतांचे फायदे:

जीवाणू खतांमुळे रासायनिक खताचा कार्यक्षम वापर होऊन, त्यात बचत होऊ शकते. पर्यावरणपूरक जीवाणू खते जमिनीचा पोत सुधारतात व पीक उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ करण्यास मदत करतात. जीवाणू खतांमुळे बियाण्यांची उगवणशक्ती वाढते. जैविक खते सूक्ष्म अन्नद्रव्याबरोबरच जिब्रेलिक ऍसिड, सायटोकायनिन इन्डॉल ॲसिटीक ॲसिड, यासारखी संप्रेरके व विटामीन बी' झाडांना मिळवून देतात. जैविक खतांद्वारे जमिनीत प्रतिजैविके सोडली गेल्याने काही प्रमाणात बुरशीजन्य रोगांचे देखील नियंत्रण होते. जीवाणू खते जमिनीत आढळणाऱ्या उपयुक्त जीवाणूपासूनतयार केलेली असतात. त्यापैकी अझोटोबॅक्टर, ॲझोस्पीरिलम, निळी हिरवी शेवाळे आणि ॲझोला पिकास नत्र पुरवितात. बॅसीलस पॉलिमिक्स जीवाणू स्फुरदाची उपलब्धता वाढवितात तर मायकोराईझा सारखे जीवाणू पिकास स्फुरद, पालाश, नत्र, कॅल्शियम, सोडियम, जस्त, तांबे, यासारखी अन्नद्रव्ये जमिनीतून शोषण करण्यासाठी मदत करतात. यापैकी अझोटोबॅक्टर आणि रायझोबियम ही संवर्धने प्रचलित असून इतर जीवाणू



खताच्या अधिक वापरासाठी कृषी खाते व कृषी विद्यापीठे प्रयत्नशील आहेत.

जीवाणू खत (संवर्धन) वापरण्याची पद्धती : अझॅटोबॅक्टर अथवारायझोबियम जीवाणू संवर्धन वापरायचे असल्यास संवर्धनाचे १ पाकिट (२५० ग्रॅम) ५०० लिटर पाण्यात मिसळून केलेले द्रावण बियाण्यांवर शिंपडून हलक्या हाताने चोळावे. जिवाणू संवर्धन लावलेले बियाणे स्वच्छ कागदावर किंवा पोत्यावर सुकवावे आणि लगेच पेरणीसाठी वापरावे. एका पाकीटातील संवर्धन (२५० ग्रॅम)१० ते १५ किलो बियाणांवर प्रक्रिया करण्यासाठी पुरेसे होते. गुळाचे पाणी (५० ते १०० ग्रॅम गूळ + ५०० मिली पाणी) वापरल्यास जास्त परिणामकारक ठरते. उसाची एक एकर लागवण करण्यासाठी ५० लिटर ॲसीटॉबॅक्टरची ८ पाकीटे आणि स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) ८ पाकीटे मिसळून द्रावण तयार करुन उसाच्या कांडया या द्रावणामध्ये बुडवून लगेच लावणी करावी. बटाट्याच्या एक एकर लागणाऱ्या बेण्यासाठी अझोटोबॅक्टरची ८ पाकीटे व स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) ८ पाकीटे ५० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे व द्रावणात बेणे बुडवून लावणी करावी. हळद, आले (अद्रक) एक एकरा करीता लागणाऱ्या बेण्यासाठी अझोटोबॅक्टरची ८ पाकीटे व स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) ८ पाकीटे ५० लिटर पाण्यात मिसळून द्रावणात बेणे बुडवून लागवड करावी. मिरची, तंबाखू, कांदा, फळे आणि भाजीपाला पिकांसाठी ॲझोटोबॅक्टरची १० पाकीटे आणि स्फुरद विद्राव्य जीवाणूंची (पीएसबी) १० पाकीटे २० लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार करावे. रोपाची लावणी करते वेळी रोपाची मुळे या द्रावणामध्ये ५ मिनीटे बुडवून नंतर लावणी करावी. ज्वारी पिकास ॲझोस्पीरिलम व स्फुरद विद्राव्य जीवाणू संवर्धनाची आणि हरभरा पिकास रायझोबियम व स्फुरद विद्राव्य जीवाणू संवर्धनाची एकत्रित (२५० ग्रॅम प्रत्येक जिवाणू संवर्धन प्रति १ किलो बियाणास) बिजप्रक्रिया करावी, अशी शिफारस करण्यात येते. जीवाणू संवर्धन वापरतांना घ्यावयाची काळजी : जीवाणू संवर्धने पाकिटावर नमूद केलेल्या पिकांसाठी सूचनेप्रमाणे अंतिम दिनांकापूर्वी वापरावीत. बियाण्यांस बुरशीनाशके किंवा कीटकनाशके अगोदर वापरावीत व त्यानंतर जीवाणू संवर्धन लावावे. जीवाणू संवर्धन अथवा संवर्धनाची प्रक्रिया केलेले बियाणे खतात मिसळू नये. जीवाणू संवर्धन खरेदी करताना वापरासंबंधी अंतिम तारीख तसेच पिकाचे नाव पाहूनच खरेदी करावे व पाकिटास सावलीत थंड जागी ठेवावे. वेगवेगळ्या व्दिदल पिकासाठी वेगवेगळे रायझोबियम वापरावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७८० : जेम्स ऑगस्टस हिकी यांनी 'कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर' या नावाने एक साप्ताहिक सुरू केले. पुढे याचे वर्तमानपत्रात रुपांतर झाले. 'हिकी'ज बेंगॉल गॅझेट' या नावाने ओळखले जाणारे हे वृत्तपत्र म्हणजे भारतातील पत्रकारितेची सुरुवात मानली जाते.
१८६१ : कॅन्सास हे अमेरिकेचे ३४ वे राज्य बनले.
१८८६ : कार्ल बेंझ याला जगातील पहिल्या इंजिनवर चालणार्या मोटरगाडीचे पेटंट मिळाले.
१९७५ : इंडियन नॅशनल थिएटर निर्मित आणि पु. ल. देशपांडे यांनी लिहिलेल्या व दिग्दर्शित केलेल्या 'ती फुलराणी' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईतील रविंद्र नाट्यमंदिर येथे झाला.
१९८९ : हंगेरीने दक्षिण कोरियाबरोबर राजनैतिक संबंध प्रस्थापित केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२७४ : संत निवृत्तीनाथ (मृत्यू: १७ जून १२९७)
१७३७ : थॉमस पेन अमेरिकन विचारवंत, राजकारणी आणि क्रांतिकारक (मृत्यू: ८ जून १८०९)
१८४३ : विल्यम मॅक किनले अमेरिकेचे २५ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १४ सप्टेंबर १९०१)
१८५३ : मधुसूदन राव आधुनिक ओडिया साहित्याच्या तीन प्रवर्तकांतील एक प्रवर्तक. ओरिसावर मराठ्यांचे राज्य असताना महाराष्ट्रातून जी कुटुंबे ओरिसात जाऊन स्थायिक झाली, त्यांपैकी एका कुटुंबात जन्म. (मृत्यू: १९१२)
१८६० : अंतॉन चेकॉव्ह रशियन कथाकार व नाटककार. याने मॉस्को विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली होती मात्र वैद्यकीय व्यवसाय कधी केला नाही. (मृत्यू: १५ जुलै १९०४)
१८६६ : रोमें रोलाँ साहित्यातील नोबेल पारितोषिक (१९१५) विजेते फ्रेन्च लेखक, नाटककार व संगीत समीक्षक (मृत्यू: ३० डिसेंबर १९४४)
१९२२ : प्रो. राजेंद्र सिंग ऊर्फ 'रज्जू भैय्या' राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ४ थे सरसंघचालक (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९२६ : डॉ. मोहम्मद अब्दूस सलाम भौतिकशास्त्रज्ञ, नोबेल पारितोषिक विजेते (१९७९) एकमेव पाकिस्तानी, विज्ञानातील नोबेल पारितोषिक विजेते एकमेव मुस्लिम (मृत्यू: २१ नोव्हेंबर १९९६ ऑक्सफर्ड, इंग्लंड)
१९५१ : अँडी रॉबर्टस वेस्ट इंडिजचा जलदगती गोलंदाज
१९७० : राज्यवर्धनसिंग राठोड ऑलिम्पिक रौप्यपदक विजेता भारतीय नेमबाज

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५९७ : महाराणा प्रताप मेवाडचा सम्राट (जन्म: ९ मे १५४०)
१८२० : जॉर्ज (तिसरा) इंग्लंडचा राजा (जन्म: ४ जून १७३८)
१९३४ : फ्रिटझ हेबर नायट्रोजनपासून मोठ्या प्रमाणावर अमोनिआ वायू मिळवण्याची पद्धत शोधल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळालेले (१९१८) जर्मन रसायनशास्त्रज्ञ. (जन्म: ९ डिसेंबर १८६८ वॉर्क्लॉ, पोलंड)
१९६३ : रॉबर्ट फ्रॉस्ट अमेरिकन कवी (जन्म: २६ मार्च १८७४)
१९६३ : सदाशिव आत्माराम जोगळेकर लेखक व संपादक. अहिल्या आणि इतर कथा, घारापुरी (१९४८), संयुक्त महाराष्ट्राचा ज्ञानकोश, सुलभ विश्वकोश ही त्यांची काही पुस्तके आहेत. (जन्म:)
१९९३ : रँग्लर गोपाळकृष्ण लक्ष्मण चंद्रात्रेय गणितज्ञ (जन्म:)
१९९५ : रुपेश कुमार रुपेरी पडद्यावरील खलनायक, निर्माते व दिग्दर्शक (जन्म:)
२००० : पांडुरंग सावळाराम तथा काका वडके शिवसेना नेते (जन्म:)
२००० : देवेन्द्र मुर्डेश्वर बासरीवादक (जन्म:)
२००१ : राम मेघे महाराष्ट्राचे शिक्षणमंत्री (जन्म:)

# पपईच्या हायब्रीड तंत्रज्ञानामुळे दुप्पट उत्पन्न

पपई हे जगातील उष्णकटिबंधीय आणि समशीतोष्ण प्रदेशातील महत्त्वाचे फळ आहे. त्याचा उगम उत्तर अमेरिकेत झाला आणि सोळाव्या शतकात भारतात आणला गेला. सध्या ऑस्ट्रेलिया, हवाई, तैवान, पेरू, फ्लोरिडा, टेक्सास, कॅलिफोर्निया, गोल्ड कोस्ट, मध्य आणि दक्षिण आफ्रिका, पाकिस्तान, बांगलादेश आणि भारत यासारख्या सर्व उष्णकटिबंधीय आणि समशीतोष्ण देशांमध्ये त्याची लागवड केली जाते.

हवामान : पपई बियाणे उगवण करण्यासाठी सर्वोत्तम तापमान ३५ आहे. हिवाळ्यात रात्रीचे तापमान १२ अंश सेल्सिअसपेक्षा कमी असल्यास त्याचा झाडांच्या वाढीवर आणि फळांच्या उत्पादनावर नकारात्मक परिणाम होतो. ६.५-७.५ असलेली हलकी आणि चिकणमाती आणि पाण्याचा चांगला निचरा होणारी जमीन पपईच्या लागवडीसाठी उत्तम आहे.

पपईच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती :

वॉशिंग्टन : पपईची ही जात शेतकऱ्यांमध्ये खूप लोकप्रिय आहे कारण त्याचे जड फळ (१.५ किलो पर्यंत) आणि गडद पिवळा रंग आहे. एक झाड प्रति फळ किमान ६० किलो फळ देते.

कुर्ग हनीड्यू : बौने प्रजातींमध्ये एक प्रकारचे फळ असते जे लांब आणि अंडाकृती असते. शिजवल्यावर ते पिवळे होतात. प्रत्येक फळाचे उत्पादन सुमारे ७० किलो आहे.

पुसा जायंट : या वनस्पतीचे स्टेम खूप मजबूत आहे आणि जोरदार वादळ सहन करू शकते. फळे मोठी असतात आणि त्यांचे सरासरी वजन २.५-३.० किलो असते. प्रति झाड सरासरी उत्पादन ३० ते ३५ किलो पर्यंत असते. या वनस्पतीचा वापर बहुतेक पेठा (भारतीय फ्लॅटब्रेडचा एक प्रकार) आणि भाज्या बनवण्यासाठी केला जातो.

पुसा स्वादिष्ट : झाडे सहसा फार मोठी होत नाहीत, परंतु ते सहसा भरपूर फळ देतात. झाडाचे सरासरी उत्पादन साधारणपणे ५८ ते ६१ किलो असते आणि फळाचे सरासरी वजन साधारणतः १.० ते २.० किलो असते.

एकाच वेळी तीन पिकांची पेरणी : तैवान खरबूज पिकाची लागवड पपई पिकासह रिकाम्या शेतात करता येते. दोन वर्षांनी त्याच ठिकाणी नवीन फळ पिके लागतील.

# बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरुच

## शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची धमकी

## पोलिस अधीक्षक कांवत साहेब शेतकऱ्यांची बैठक कधी घेताय?

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील पवनचक्की कंपन्यांची दादागिरी सुरुच असुन शेतकऱ्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याच्या धमक्या पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांकडुन घडला असुन पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांची बैठक घेऊन त्यांना संरक्षण देण्याची हमी दिली. कंपन्यांकडुन खंडणीखोरांवर कठोर कारवाई व्हायलाच हवी मात्र पवनचक्की कंपन्यांचे अधिकारी शेतकऱ्यांची फसवणूक करून त्यांना पोलिस केस करून तुरुंगात टाकण्याची भाषा करत असेल तर मग शेतकऱ्यांचे संरक्षण कोणी करायचे? मग पवनचक्की कंपन्यांच्या आधिका-यांची बैठक घेतली तर पिडीत शेतकऱ्यांची बैठक कधी घेणार?शेतकऱ्यांना वाली कोण ? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी पोलिस अधीक्षक नवनीत कांवत यांना केला आहे.

बीड तालुक्यातील महाजनवाडी येथील शेतकऱ्यांची अहमदपूर ते अहिल्यानगर राज्य महामार्गावर शेतजमीन असुन २ वर्षांपासून रेन्यु पावर कंपनीने गोडाऊन साठी भाडेतत्त्वावर घेतली होती. शेतकऱ्यांना एकरी ३० हजार रूपये प्रतिवर्ष भाडेतत्त्वावर शेतजमीन घेतली. त्यांना वार्षिक भाडेही दिले मात्र जाताना जमिन पुर्ववत करून देण्याचे बांधबंदिस्ती, खडकाळ जमिनीत गाळ टाकुन देण्याचे आश्वासन मात्र



साफ विसरून गेले आज दि.२७ कंपनीच्या गाड्या जागा खाली करत असताना शेतकऱ्यांनी गाड्या अडवून विचारणा केली असता त्यांना गाड्या सोडुन द्या अडवु नका अन्यथा पोलिस केस करून तुरुंगात टाकु अशी धमकी दिल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.आता त्यांनी आमच्यावर गुन्हे दाखल करूनच पहावेत असे महादेव सदाशिव कदम, बाबासाहेब कदम,संजय घरत,विष्णु घरत यांनी म्हटले आहे. पवनचक्की कंपन्यांना आम्ही अगोदर जागा देत नव्हतोच.तेव्हा विनवनी केल्यानंतर तयार झालो.परंतु दंड मोडला,चिरे काढले तवाच आम्ही म्हणलं आमच्या रानाचं वाटुळं व्हाय लागलंय आम्हाला शेतजमीन नाही द्यायची.तेव्हा म्हणले आम्ही जाताना वाहनांच्या वावरामुळे खडकाळ होणा-या जमिनीत तलावातील गाळ टाकु, तसेच पहिल्या सारखं दंड आणि बांधबंदिस्ती करून देऊ पण आज सगळ्या गाड्या सामान घेऊन चालल्या आम्ही आधिका-यांना विचारले असता अगोदर म्हणले ४-८ दिवसांनी येऊन करून देऊ.नंतर तर म्हणले गाड्या सोडुन द्या नाहीतर पोलिस केस करून तुरुंगात टाकु.

मग आम्ही म्हणलो आता पोलिस केस करूनच दाखव बघु काय होईल ते अशी संतप्त प्रतिक्रिया महादेव सदाशिव कदम यांनी डॉ.गणेश ढवळे यांच्याशी बोलताना दिली. पोलिस अधिक्षक नवनीत कांवत यांनी २ जानेवारी रोजी बीड जिल्ह्यात पवनचक्की उभारताना त्रास होऊ नये म्हणून सौर व पवन ऊर्जा प्रकल्प अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

आणि दलाल खंडणीखोरांना घाबरू नका , खंडणी मागत असतील तर जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार करा. स्थानिक पोलिसांचे नंबर ठेवून त्यांना माहिती द्या आणि संकट समय ११२ नंबरला फोन करा अशा प्रकारच्या विविध सूचना दिल्या परंतु हे पवनचक्की कंपनी वाले धुतल्या तांदळासारखे अजिबात नाहीत. त्यांनी बीड जिल्ह्यातील कायदा अनुसूव्यवस्था बाधित केले आहे त्यांचे रक्षण करणे हे पोलिसांची जबाबदारी आहे त्याचबरोबर इथल्या शेतकऱ्यांना संरक्षण देणे. पवनचक्की कंपन्यांकडून त्रास होत असेल तर त्यांचे संरक्षण करणे हि सुद्धा त्यांची जबाबदारी आहे.त्यामुळे पिडीत शेतकऱ्यांची बैठक पोलिस अधीक्षक साहेब कधी घेणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.

# सुरुडी आश्रमशाळा प्रकल्प स्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम



आष्टी। प्रतिनिधी

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प छत्रपती संभाजीनगर अंतर्गत शासकीय माध्यमिक आश्रमशाळा सुरुडी ने प्रकल्पस्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२४-२५ मध्ये माध्यमिक विभागात प्रथम क्रमांक पटकावला. प्रकल्पाधिकारी चेतना मोरे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच डॉ.उद्धव वायाळ, सहाय्यक प्रकल्पअधिकारी, विनोदकुमार सांगळे, सहाय्यक प्रकल्पाधिकारी उल्हास चव्हाण, पुरुषोत्तम कायंदे, आदिवासी निरीक्षक, जितेंद्र दीक्षित यांच्या प्रमुख उपस्थितीत सिद्धार्थ अनुदानित आश्रमशाळा चौका जि. छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या प्रकल्प स्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये सुरुडी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक सुधाकर राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रवीण पुंड, विशाल दोरगे, प्रतीक्षा मेश्राम, अमित पवार, मदन सावंत यांच्या नेतृत्वाने, कु.वैष्णवी गायकवाड व जना कवरे या विद्यार्थिनींनी 'महामार्गावरील पवनचक्की' हे मॉडेल प्रदर्शनासाठी ठेवले होते. त्याची निवड विभागीय प्रकल्प स्तरावर झाली आहे. नियमित नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असलेल्या सुरूडी आश्रम शाळेचा विज्ञान प्रदर्शनात प्रकल्पस्तरावरील विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक आल्याने शाळेचे अभिनंदन करण्यात होत आहे.

## थोडक्यात



### पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी येथे ध्वजारोहण

राजुरी। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळवाडी हायस्कूल पिंपळवाडी या शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त युवा नेते रोहित क्षीरसागर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप हे होते. भारतीय स्वतंत्र्याच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त युवा नेते रोहित क्षीरसागर तसेच श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहिरवाळ यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेत विविध कार्यक्रम घेण्यात आले. याप्रसंगी सरपंच सौ.शोभाताई बहिरवाळ, उपसरपंच गणेश बहिरवाळ, सुभाष बहिरवाळ, महादेव पाटील, ग्रामपंचायत सदस्य विश्वास पाटील, सय्यद शाहेद, ठोकळ कल्याण, शिवप्रसाद कळसाने, राजाभाऊ नहिराळे, संतोष वाघुले, शामराव कलढोणे, पठाण सलमान यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, नवयुवक शाळेचे सर्व आजी-माजी विद्यार्थी, पशुवैद्यकीय अधिकारी तसेच आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी, केंद्रीय जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गाडे, शेख शब्बीर, मधुकर पाटील, श्रीरंग खटाने, संभाजी पाटील, संजय बहिरवाळ, बाळासाहेब कळसाने, अफसर पठाण, लिंबाजी पाटील, प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत मुलांचे लेझीम नृत्य, मुलींचे लेझीम नृत्य, मुलींचे टिपरी नृत्य सादर करण्यात आले, या प्रसंगी या कार्यक्रमाला गावातील व पंचक्रोशीतील पालकांनी आणि आजी-माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात प्रतिसाद दिला.

### गोवर्धन पवार यांना उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार



बीड । प्रतिनिधी

शहरातील यशवंत विद्यालय या शाळेचे सामाजिक शास्त्र व क्रीडा विभागाचे शिक्षक गोवर्धन नवनाथराव पवार यांना भूगोल प्रज्ञाशोध केंद्र नवी मुंबई या संस्थेमार्फत दरवर्षी दिला जाणारा उपक्रमशील भूगोल शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. गोवर्धन पवार हे आपल्या सामाजिक शास्त्र या विषयांमध्ये नेहमी सक्रिय असतात. तसेच ते भूगोल या विषयासाठी नवनवीन उपक्रम आयोजित करतात. स्पर्धा परीक्षा बद्दल विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन रुजवावा व स्पर्धा परीक्षेची भीती विद्यार्थ्यांमध्ये राहू नये यासाठी प्रयत्न करतात. राज्यामध्ये जे शिक्षक भूगोल विषया विषयी जनजागृती करून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करतात त्या शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो. या निमित्ताने या संस्थेमार्फत २०२४ चा पुरस्कार गोवर्धन नवनाथराव पवार यांना जाहीर करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रोटरी क्लब बीड मिडटाऊन चे अध्यक्ष नितीनजी गोपन, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक गणेश वाघ, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक धुमाळ एम.एस.,कार्यकारी अभियंता सुधाकर बाहेरगव्हाणकर या मान्यवरांच्या हस्ते गोवर्धन नवनाथराव पवार यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# मुख्याधिकारी अंधारे व बांधकाम अभियंता देशमुख यांच्यावर गुन्हा दाखल करा-वाघमारे

बीड/प्रतिनिधी

बीड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी श्रीमती अंधारे व अभियंता देशमुख किरण देशमुख यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी कारवाई करण्यासाठी प्रा.सनी वाघमारे यांनी शासनाकडे परवानगी मागितली असून ही परवानगी मिळाली नाही तर न्यायालयात जाणार असल्याचे प्रा.सनी यांनी सांगितले.

बीड नगरपरिषद मुख्याधिकारी अंधारे मॅडम व बांधकाम अभियंता किरण देशमुख हे कोणत्या ना कोणत्या कारणाने नेहमी चर्चेत असणारे शहराच्या स्वच्छतातेच्या बाबतीत असेल घंटागाडी असेल महिन्यातून एकदा कार्यालयामध्ये उपलब्ध असणाऱ्या अंधारे मॅडम, बांधकाम अभियंता किरण देशमुख हे नगरपालिका प्रशासकीय इमारतीमध्ये रुजू झाल्यापासून त्यांच्या केबिनला आज पर्यंत बसलेच नाहीत. तसेच कोणत्याही साइटवर भेट न देणे कामाची पाहणी न करणे. मग हे अधिकारी जन सामान्याचे प्रश्न केव्हा सोडवत असतील हा संशोधनाचा विषय बनला आहे. सदरील हे अधिकारी बीड नगर परिषदेचा कारभार हे स्वतःच्या घरातून चालवतात अशा विविध कारणांनी नेहमी हे प्रसिद्धीच्या झोतात असतात.अशा या बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंधारे मॅडम तसेच बांधकाम अभियंता किरण देशमुख यांनी संगनमत करून एका विशिष्ट घटक समूहावर आर्थिक बहिष्कार घालून तसेच कर्तव्यात कसूर केल्याबद्दल या लोकसेवका विरुद्ध अनुसूचित जाती व जमाती ॲक्ट नुसार तसेच या लोकसेवकांनी कर्तव्यात कसूर करणे. याबाबत मी नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई तसेच नगरपरिषद प्रशासन नवी मुंबई यांच्याकडे संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळावी यासाठी विनंती अर्ज केला आहे.



जालना: जिल्हा व्हॉइस ऑफ मिडियाच्या वतीने पत्रकारांच्या मागणीचे निवेदन पालकमंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना देण्यात आले तसेच त्यांचे पत्रकाराच्यावतीने जिल्ह्याचे पहिले महिला पालकमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यात आले.

# खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत सोहम लांगोरे व वेदा कट्टे यांचे यश

बीड। प्रतिनिधी

प्रजासत्ताक दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त बीड डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन तर्फे कट्टे हॉस्पिटल बीड येथे खुल्या बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्ह्यातून अनेक खेळाडू सहभागी झाले होते. सरस्वती प्रतिमेचे पूजन करून स्पर्धची सुरुवात करण्यात आली.या स्पर्धेत खुल्या गटातून सोहम लांगोरे व लहान गटातून कु.वेदा कट्टे यांनी प्रथम क्रमांक मिळवला. यावेळी स्पर्धकांना मार्गदर्शन करताना मुख्य प्रशिक्षक दत्तात्रय क्षीरसागर यांनी सांगितले की,मैदानी खेळ आपल्या शारीरिक क्षमतेची कसोटी पाहतात तर बुद्धिबळासारखा खेळ आपली स्मरणशक्ती, निर्णयक्षमता, एकाग्रता, आत्मविश्वास अशा अनेक गुणांचा विकास करीत असतो. त्यामुळे आजच्या स्पर्धेच्या युगात व नित्याच्या जीवनशैलीत बुद्धिबळ खेळाचा विद्यार्थ्यांना फायदा होतो.



सदरील खुल्या बुद्धिबळ स्पर्धेत इयत्ता ०१ ली ते ०५ वी तसेच इयत्ता सहावी व त्यापुढील अशा दोन वयोगटातील खेळाडू सहभागी झाले होते. दोनही गटातील एकूण पहिल्या पाच विजेत्या खेळाडूंना आकर्षक बक्षीस देण्यात आली.सदरील स्पर्धा ही आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ नियमानुसार खेळवली गेली.स्पर्धेतील प्रथम पारितोषिक ऐश्वर्या डिजिटल कलर लॅब यांच्यातर्फे देण्यात आले. तसेच कट्टे हॉस्पिटलचे डॉ.विजय कट्टे यांच्यातर्फे विजेत्या स्पर्धकांसाठी ट्रॉफी देण्यात आली.खुल्या गटातून प्रथम सोहम अतुल लांगोरे द्वितीय झिशान पटेल, तृतीय आदित्य बाळू घुगे,चौथे दीपक ढेपे आणि पाचवे बक्षिस विश्व होळकर यांना मिळाले. तर इयत्ता ०१ ली ते ०५ वी गटात कु.वेदा विजय कट्टे प्रथम, पार्थ मस्के द्वितीय,अर्जुन वाणी तृतीय, दक्षतराज फाळके चतुर्थ तर सार्थक पालसिंगणकर यास पाचवे बक्षिस मिळाले.या सर्व विजेत्यांना रोख रक्कम व ट्रॉफी असे बक्षिस स्वरूपात देण्यात आले.पंच म्हणून श्री.दत्तात्रय क्षीरसागर सर व श्री. रामप्रसाद शेंडगे सरांनी काम पाहिले.स्पर्धा यशस्वी करण्यासाठी डॉ. विजय कट्टे,संजय होळकर,वाणी सर, मस्के सर,हांगे सर,पालसिंगणकर सर यानी विशेष सहकार्य केले. जिल्ह्यातील पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी झाले.विजेत्या स्पर्धकांचे सर्वांनी कौतुक व अभिनंदन केले.

# लेखिका रूपाली देशपांडे यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

आपल्या परखड व सडेतोड लेखणीने अल्पावधीतच वाचकप्रिय ठरलेल्या लेखिका तथा उद्योजिका रूपाली देशपांडे यांना जागतिक महिला दिनानिमित्ताने पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

या पुरस्कारासाठी शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या, कायम वेगळेपण जपणाऱ्या, बीड जिल्ह्यातील पहिल्या महिला इव्हेंट मॅनेजर रूपाली जयंत देशपांडे यांची निवड करण्यात आली आहे. मूळ बीड जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या तथा लेखिका रूपाली जयंत देशपांडे यांनी मृत्यूवर मात करत नव्याने आपले आयुष्य नेत्रदीपक करण्याचा प्रयत्न आपल्या अथक परिश्रमातून केला आहे. बीड जिल्ह्यातील भावी पिढी सुसंस्कारी घडावी यासाठी रवींद्रनाथ टागोर यांच्या शांतिनिकेतन सारखे एक आदर्शवत गुरुकुल बीडमध्ये निर्माण करण्याचा मानस रूपाली देशपांडे यांनी स्वप्नी बाळगला आहे. धोंडीपुरात वीस वर्षांपूर्वी पहिले जनरल स्टोअर दुकान सुरू करणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. या व्यवसायानंतर लग्न मंडपाचा व्यवसाय सुरू करणाऱ्या देखील त्या बीड च्या पहिल्याच महिला होत्या. एवढेच नव्हे तर पुढे त्यांनी इव्हेंट मॅनेजर म्हणून काम सुरू केले. हे काम देखील पहिल्या महिला म्हणूनच त्यांनी सुरू केले. त्यांच्या या जीवन कार्याची दखल घेऊन, त्यांनी स्वीकारलेले आव्हानात्मक वेगळेपण लक्षात घेऊन पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने ८ मार्च २०२५ रोजी त्यांना जागतिक स्त्रिरत्न पुरस्कार देण्यात येणार आहे. या पुरस्कारात सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

# प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण

आष्टी। प्रतिनिधी

७६ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार भवन येथे सकाळी ८:४५ मिनिटांनी आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आष्टी तालुका पत्रकार संघाचे सर्व सन्माननीय सदस्य उपस्थित होते. देशभरात ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.त्याप्रमाणे आष्टी तालुक्यात देखील सर्व शासकीय निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयात हा राष्ट्रीय सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आष्टी तालुका पत्रकार संघाच्यावतीने पत्रकार भवन येथे प्रजासत्ताक दिन अध्यक्ष प्रविण पोकळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुध्दे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष तथा संपादक दत्ताभाऊ काकडे, गणेश शेठ लाहोटी,पत्रकार भिमराव गुरव, उपाध्यक्ष संतोष सानप,पत्रकार विनोद ढोबळे, सचिव शरद रेडेकर,पत्रकार रघुनाथ कर्डिले, पत्रकार शरद तळेकर,पत्रकार सचिन रानडे, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार मनोज पोकळे आदींसह नागरिक उपस्थित होते.

# कुंभमेळ्यात संत एकनाथ महाराज शंकरानंद तीर्थ स्वामींच्या पादुकास स्नानाचा मान

बीड। प्रतिनिधी

यंदा तब्बल १४४ वर्षांनी अमृत पूर्ण महाकुंभास उत्तरप्रदेशातील इलाहाबाद येथील प्रयागराज येथे सुरूवात झाली असुन या महाकुंभात बीड तालुक्यातील नवगण राजुरी येथील अमृताश्रमस्वामी हे संत एकनाथ महाराज व शंकरानंद तीर्थ स्वामींच्या पादुका घेवुन गेले असुन या पादुकांना स्नानाचा पहिल्यांदा मान मिळाला आहे. १४ जानेवारी मकर संक्रांती दिवशी पादुकांना स्नान घालण्यात आले आहे.

आता बुधवार २९ जानेवारी २०२५ रोजी मौनी अमावस्येच्या दिवशी दुसरे स्नान आहे. तर तिसरे स्नान वसंत पंचमीला ३ फेब्रुवारी २०२५ रोजी आहे. कुंभमेळ्यात महामंडलेश्वर शंकराचार्य हे स्नान करणार आहेत १९९५ पासून नवगण राजुरीचे भूमिपुत्र अमृत महाराज जोशी यांना भारतातील साधुसंतांनी अनेक पदव्या दिलेल्या आहेत. श्रीमहंत, महामंडलेश्वर या पदव्यांनतर अमृत महाराज हे आचार्य झाले. आता अमृताश्रम स्वामी हे धर्मगुरू आहेत त्यांच्याकडील संत एकनाथ महाराज व शंकरानंद तीर्थ स्वामींच्या चरण पादुकेस प्रयाग येथे स्नानाचा मान मिळाला आहे.

धर्मगुरू अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या समवेत बाबाजी शेळके ,संतोषानंद शास्त्री, सागर वनगुजरे, विठ्ठल स्वरूप महाराज , ऋषिकेश



पवार, केशव भेगडे, शेखर जांभुळकर ,वरद जोशी ,सौरभ रोडे ,अंकुश घोडके , मकरंद शास्त्री जोशी बरोबर आहेत. गंगापूजन व पंचोपचार पूजा करण्यात आल्यांनतर प्रयाग येथील त्रिवेणी संगमात चरण पादुकांचे स्नान झाले. ज्योतिष पिठाचे शंकराचार्य अविमुक्तेश्वरनंद सरस्वती, सामवेदीय द्वारका पिठाचे शंकराचार्य सदानंद सरस्वती ,जगद्गुरु द्वाराचार्य राजेंद्र दास देवाचार्य मलूकपीठ, आनंद आखाड्याचे पिठाधीश्वर बालकानंद स्वामी, सुमेरू पिठाचे शंकराचार्य नरेंद्रनंद सरस्वती , आनंद आखाड्याचे महंत गणेशनंद सरस्वती , भक्तीचरणदास त्याच बरोबर जुना आखाड्याचे पिठाधिश्वर आचार्य महामंडलेश्वर अवधेशानंद गिरी महाराज, गिरीधर गिरीजी कृष्ण निवास, त्रिवेंद्रनंद सरस्वती, अभिदानंद गिरी , प्रणवानंद सरस्वती ,महानिर्वाणी आखाडा , किन्नर आखाड्यातील गुरुमाई यांनी अमृत आश्रम स्वामी महाराज यांचा सत्कार केला. यावेळी प्रयागराज येथील भाविक मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# बीड रेल्वेस्टेशनला क्रांतीसिंह नाना पाटलांचे नाव द्यावे - भाई आकाश निर्मळ

बीड । प्रतिनिधी

गेल्या अनेक पिढ्यांच्या प्रतिक्षेनंतर बीडकरांच्या रेल्वेचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होताना दिसत आहे. या रेल्वे मार्गासाठी बीड जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेसह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेकांनी वेगवेगळ्या मार्गाने मौर्चे आंदोलने करून जनरेटा कायम तेवत ठेवला आहे परंतु ज्यांनी पहिल्यांदा बीड रेल्वेची संसदेत मागणी केली ते खासदार म्हणजेच गोऱ्या इंग्रजांचे सरकार घालवण्यासाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून जीवाचे रान करणारे तत्कालीन बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार क्रांतीसिंह नाना पाटील यांनी केलेले आहे म्हणून बीड रेल्वे स्टेशनला





क्रांतीसिंह नाना पाटलांचे नाव देण्यात यावे अशी मागणी मल्हार क्रांती सेना संस्थापक/अध्यक्ष व भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे माजी मध्यवर्ती कमेटी सदस्य भाई आकाश निर्मळ यांनी केली आहे. त्या रेल्वे मागणीकडे तत्कालीन काँग्रेस सरकारकडे केली पण क्रांतिसिंह पाटील विरोधी पक्षाचे खासदार आहेत म्हणून काँग्रेस सरकारने या मागणीकडे दुर्लक्ष करत होते.

पण हार मानतील ते ''क्रांतिसिंह'' कसले!

क्रांतिसिंहांनी तीच मागणी संसदेत सातत्याने तब्बल अकरा वेळा पोटतिडकीने लावून धरली तेव्हा कुठे तत्कालीन काँग्रेस सरकारला नाईलाजाने बीड-नगर-परळी रेल्वे मार्ग मंजूर करावा लागला

आपल्या बीड जिल्हयात विविध विचारधारेच समुह आपापल्या परीने व विचारधारेने बीड रेल्वे स्टेशनला अमुक नाव द्या तमुक नाव द्या असे विविध वेगवेगळे नावे पुढे करून झटताना दिसतात तसे त्यांनाही व्यक्तीस्वातंत्र्य आहे!

आमचा त्यांनाही विरोध नाही कारण प्रत्येक जन आपापल्या बुध्दीला जे पटते ते करत असतात पण ज्या नावांचा आणि बीड रेल्वेच्या ◀◀ पान ३ वर

# पंतप्रधान घरकुल आवास योजनेच्या मंजूर लाभार्थ्यांनी कागदपत्रांची पूर्तता करून लाभ घ्यावा -आ.धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना-ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत ११ हजार ९०० लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत.**



गावनिहाय ग्रामपंचायत समोर मंजूर झालेल्या लाभार्थी यांच्या याद्या लावल्या असून लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे. पंतप्रधान घरकुल योजना-ग्रामीण टप्पा -२ अंतर्गत घरकुल मंजुरी व पहिला हप्ता वितरणाचे काम हाती घेतले.प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मंजूर लाभार्थ्यांच्या मतदारसंघातील गावनिहाय यादी ग्रामपंचायत कार्यालयासमोर लावण्यात आली आहे.यामध्ये आष्टी ६१५७,पाटोदा २९०२,शिरूर कासार २८०५ तिनी तालुक्यात घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे दोन दिवसात करावी. तात्काळ पुढच्या आठवड्या पर्यंत लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये अनुदान जमा केले जाणार आहे. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे दोन दिवसात जमा कराव्यात म्हणजे ऑनलाइन प्रणाली मार्फत घरकुल मंजुरी व लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा जाणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी सांगितले आहे.

# एसटी भाडेवाढ विरोधात जिल्हाप्रमुख सातपुते, वरेकर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी चक्काजाम

**बीड । प्रतिनिधी**

जनसामान्याच्या आयुष्याचा अविभाज्य भाग असलेल्या एसटी भाडेवाढ विरोधात शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड



जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड जिल्हा

शिवसेना उद्धव - बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बीड मध्यवर्ती बस स्थानकातील गेटसमोर आज चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर बोलताना म्हणाले की आम्ही सत्तेत आल्यावर राज्यामध्ये गोर गरिबांसाठी काम करु असे आश्वासन महाराष्ट्र राज्यात महायुती ◀◀ पान ३ वर

# खोलेश्वरच्या प्रगती विभागात प्रजासत्ताक दिनानिमित्त ई-कचरा संकलन जागृती फेरी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनासाठी आपल्या घरातील ई - कचरा श्री.खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, प्रगती विभाग शाळेत जमा करून आपला अमूल्य सहभाग आपण नोंदवावा, असे आवाहन या संकलन फेरीद्वारे विद्यार्थ्यांनी सर्वांना केले.

या ई-कचरा जनजागृती संकलन फेरी प्रसंगी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या सन्माननीय अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक चंद्रकांत मुळे, केंद्रीय विद्यासभा उपाध्यक्ष उमेश जगताप, विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे, प्रगती वर्ग विभागप्रमुख सौ.वर्षा मुंडे व शिक्षकवृंद उपस्थित होते.



ई - कचरा अंतर्गत येणाऱ्या अनेक वस्तू जमा करण्यास सर्वांना सांगितले. पर्यावरण रक्षणासाठी शहरांमधील नागरिकांना जास्तीत जास्त संख्येनी ई-कचरा नजीकच्या संकलन केंद्रांवर आणून द्यावा आणि सुयोग्य कचरा व्यवस्थापनाला चालना देत पर्यावरण संवर्धनात आपला वाटा उचलावा, असेही विद्यार्थ्यांनी सर्वांना सांगितले व त्यासंदर्भात पत्रकही वाटप केले. ही संकलन फेरी कुत्तर विहीर, केशवनगर, दीनदयाळ कॉलनी, चौसाळकर कॉलनी व आंबेडकर चौक या मार्गे काढण्यात आली. मुख्याध्यापक व विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाने व शिक्षक बंधू-भगिनींच्या सहकार्याने ई-कचरा संकलन फेरी यशस्वी झाली. ई-कचरा जनजागृती व कचरा संकलन अभियान प्रजासत्ताक दिनानिमित्त राबविण्याचे प्रांत पर्यावरण शिक्षण गतीविधी यांच्या वतीने ठरविले असून, या मध्ये आपली संस्था सहभागी होऊन आपण हा उपक्रम आपल्या स्थानिक ठिकाणी येत्या २६ जानेवारी २०२५ च्या आधी ई कचरा संकलन केंद्राची उभारणी करणार आहोत. ई कचरा म्हणजे काय ? निरूपयोगी इलेक्ट्रॉनिक वस्तू पासून तयार झालेला कचरा म्हणजे ई कचरा त्यामध्ये निरुपयोगी वस्तू मोबाईल, घड्याळ, लॅपटॉप, कॅम्पुटर, टीव्ही, रिमोट, इ.वस्तूचा समावेश आहे.

# श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थान येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

गेवराई । प्रतिनिधी

भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान कुंभेजळगाव ,(ता.गेवराई) येथे भगवान कुंभेश्वर व भगवान गोरक्षनाथ महाराज यांच्या कृपेने वै.ब्रम्हनिष्ठ गुरुवर्य महंत वामन महाराज गिरी यांच्या पुण्यतिथीनिमीत्त ह.भ.प महंत दत्ता महाराज गिरी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दि.२९ फेब्रुवारी पासून ५३ वा अखंड हरिनाम सप्ताह व रामकथा प्रवक्ते जनार्दनजी महाराज अरावेकर



**वै.वामन महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यास बहुसंख्येने उपस्थित रहा -महंत दत्ता महाराज**

यांच्या संगीत तुळशी रामकथेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भाविकांनी बहुसंख्येने ◀◀ पान ३ वर

# मच्छिंद्रनाथ मायंबा यात्रोत्सवास मंगळवारपासून होणार प्रारंभ

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथील श्री क्षेत्र मायंबा मच्छींद्रनाथ देवस्थानच्या तीन दिवसीय यात्रोत्सवास मंगळवार दि.२८ जानेवारी रोजी येथे सकाळी कोठी मिरवणुकीने प्रारंभ होणार आहे, अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे, सचिव बाबासाहेब म्हस्के यांनी दिली.



जमा झालेला शिध्याची कोठी मंदिरात विधिवत पूजन होऊन दुपारी ३ वाजता कोठी मिरवणूक याच दिवशी मायंबा गडाकडे प्रस्थान करेल. बुधवार दि २९ जानेवारी रोजी नवनाथ भक्त मंडळाच्या वतीने विशाल स्वरूपात भंडाऱ्याचे आयोजन केले आहे. देवतलाव जवळ संकलित शिध्याचा नैवेद्य करून मिरवणुकीने आणून दुपारनंतन देवतांना भोग अर्पण केल जाईल. सायंकाळी सावरगाव येथे छबिना मिरवणूक रात्री ते १० दरम्यान होईल. गुरुवार दि.३० जानेवारी रोजी नामवंत कलावंत हजेऱ्या, नामवंत मल्लांचा कुस्त्यांच हंगामा होईल. शुक्रवार दि.३० जानेवारी रोजी धर्मनाथ बीज होईल महाप्रसाद होऊन यात्रोत्सवाचं सांगता होईल.

# मराठी पत्रकार परीषदेच्या पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित रहा-डोळसे, हांगे

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद मुंबई, व परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघ व सेलू तालुका मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आदर्श जिल्हा व तालुका पुरस्कार वितरण तसेच पत्रकार मेळावा दि. १ फेब्रुवारी रोजी परभणी जिल्हयातील सेलू येथे आयोजित केला आहे. या मेळाव्यास बीड जिल्हयातील तालुका पदाधिकाऱ्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राज्य का.सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा प्रसिध्दी प्रमुख संजय हांगे यांनी केले आहे.





हा पुरस्कार कार्यक्रम साई नाट्यगृह सेलु येथे दि.१ फेब्रुवारी २०२५ रोजी भव्य आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख हे राहणार असून या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून परभणी जिल्हयाच्या पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर,कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा.सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूरभाई शेख, उपाध्यक्ष गोपी लांडगे, गणेश मोकाशे,हेमंत वनजू, अविनाश भांडेकर,चंद्रकांत बरदे, विभागीय ◀◀ पान ३ वर

# तांदळेश्वर विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा

बीड । प्रतिनिधी

आज तांदळेश्वर विद्यालय तांदळवाडी घाटी या शाळेमध्ये प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य एस आर खोसेसर हे होते त्याचबरोबर गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच बळीराम शिरसाट उपसरपंच महादेव अण्णा खोसे अंधापुरीचे सरपंच सौ जगताप ताई ग्रामपंचायत सदस्य अनिल खोसे शहादेवराव खोसे रामहरी भागडे सुंदर तात्या खोसे अशोक तात्या पांचाळ संजय खोसे सेवा सहकारी सोसायटी चेअरमन रंगनाथ शिरसाट ग्रामपंचायत सदस्य काळे माजी सरपंच डॉक्टर निवांत चव्हाण कचरू काळे श्रीहरी खोसे मा चेअरमन सेवा सहकारी सोसायटी जगन्नाथराव काळे



अविनाश राहींज प्रतापराव खोसे ज्येष्ठ नागरिक अनिल भोसले सोमनाथराव पाटील संपादक दैनिक झुंजार सेनापती श्रीकृष्ण भागडे उर्फ पिंटू शेठ माजी सरपंच सुनील रावजी खोसे दिगंबर भाऊ खोसे पोलीस पाटील विशाल राहींज नितीन शिरसाट गजानन शिरसाठ शिवाजी बागडे विक्रम खोसे शिवाजी बजरंग खोसे माजी सैनिक आत्माराम खोसे इत्यादी सह अनेक शेकडो नागरिकांची महिला बंधू-भगिनींची उपस्थिती होती

विद्यालय मध्ये सर्व विद्यार्थी व सर्व पालक सर्वांना फेटे बांधून विद्यालयाने स्वागत केले विद्यालयामध्ये विविध स्पर्धेचे आयोजन केले होते त्यामध्ये क्रिकेट स्पर्धा खोखो स्पर्धा कबड्डी स्पर्धा इंग्लिश स्पीच स्पर्धा सर्व स्पर्धेचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले त्याचबरोबर विविध कला गुणदर्शन हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला लेझीम पथकाने सर्व गावकऱ्यांचे स्वागत करून वैयक्तिक नृत्य व सामुदायिक लेझीम नृत्य विद्यालयामध्ये सादर करण्यात आले सर्व पालकांनी सर्व विद्यार्थ्यांची शाळेचे शाळेतील सर्व शिक्षकांचे कौतुक केले याप्रसंगी जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय क्षीरसागर सर व त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते महादेवांना खोसे उपसरपंच यांनी सर्वांच्या वतीने मार्गदर्शन केले मार्गदर्शनात त्यांनी शाळेच्या प्रगती विषयी समाधान व्यक्त केले विद्यार्थ्यांना दहावीच्या परीक्षेत शुभेच्छा दिल्या व डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर यांनी शाळेत आमच्या कुठल्याही अडचणी समर्थ राहण्याचे आश्वासन सर्व गावकऱ्यांना त्यांनी दिले.

# रुपामाता नॅचरल शुगरमुळे सिंदफना काठच्या शेतकऱ्यांना न्याय मिळाला - धोंडीराम जाधव

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यात ऊस उत्पादक शेतकऱ्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे परंतु साखर कारखान्यांची संख्या वाढली तर शेतकऱ्यांच्या आयुष्यामध्ये आर्थिक क्रांती येऊ शकते. हे गमक ओळखून मी माजलगाव चे माजी आमदार मा आर टी देशमुख(जिजा) हे आमदार असतानाच त्यांना प्रत्यक्ष भेट घेऊन आपले भागात कारखाना काढणे संदर्भात विनंती केली होती आमचे गावात जमिनी मिळवून देतो असा शब्द मी गावकऱ्यांच्या वतीने त्यांना दिलेला होता परंतु त्यांना ते शक्य झाले नाही. नंतरच्या काळात आमच्या रोशनपुरी येथे रूपमाता नॅचरल शुगर च्या उभारणीने शेतकऱ्यांमध्ये चैतन्य निर्माण झाले आहे.



सिंदफणा नदीकाठच्या रोशनपुरी या गावांमध्ये उच्चपातळी बंधारा असल्यामुळे शेतकऱ्यांसाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाले आणि शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ऊस लागवड केली परंतु आपले भागात कारखान्याची संख्या कमी असले कारणाने आमचे भागातील गरीब शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होत होते.अशातच रूपामाता उद्योग समूहाने आमचे आग्रहाखातर रोशनपुरी, नागडगाव शिवारात आपले दुसरे युनिट सुरू केले. परिसरातील बेरोजगारांसाठी रोजगार देखील उपलब्ध झाला आणि शेतकऱ्यांचा ऊस नेण्यासाठी कारखान्या कारखान्यात स्पर्धा निर्माण झाली आणि यामुळे रोशनपुरी नागडगाव, सांडसचिंचोली, शिंपेटाकळी, मोठेवाडी, आबेगाव, बोरगाव या भागातील प्रचंड प्रमाणात बेरोजगारीचा आणि शेतकऱ्यांच्या उसाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटला आहे.

रोषणपुरी हे गाव कुणीही ओळखत नव्हते बंधारा होता, ◀◀ पान ३ वर

# दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांसाठीच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेची नियोजन बैठक

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेकारिता आज दि. २८/०१/२०२५ रोजी बीड येथे नियोजन बैठक जिल्हा समाजकल्याण अधिकारी मा. श्रीम. मेश्राम मॅडम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या बैठकीमध्ये दि. १४,१५ आणि १६ फेब्रुवारी २०२५ या तीन दिवसामध्ये जिल्ह्यातील सर्व दिव्यांगाच्या शाळेतील विद्यार्थ्याकरिता गेवराई येथे जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धा होणार असून या स्पर्धेचे



यजमानपद हे तलवडा येथील कै. केशवराव धांडे मतिमंद निवासी विद्यालय तलवडा यांना देण्यात आले आहे. या स्पर्धा गेवराई येथील मैदानावर्ती अगदी भव्य दिव्य स्वरूपात घेण्यात येतील अशी माहिती मेश्राम मॅडम व वैसाका श्री. नखाते साहेब यांनी दिली. या वेळी त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा या करिता या विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांचे प्रदर्शन ठेवण्यात आले आहे यामध्ये सांस्कृतिक, हस्तकला, चित्रकला, आणि विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे ◀◀ पान ३ वर

# वचनबध्दता, सातत्य आणि आत्मविश्वास ही यशस्वी जीवनाची त्रिसूत्री आहे- डॉ. देशपांडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉ श्रेयश देशपांडे बोलत होते. यावेळी त्यांनी सांगितले की, शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेल्या कला गुणांना पारखून त्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यशस्वी होण्यासाठी सातत्य, वचनबध्दता आणि आत्मविश्वास ही त्रिसूत्री अवलंबली पाहिजे. या



कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे हे होते, प्रमुख अतिथी शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी तथा प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ श्रेयश देशपांडे, उदघाटक केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड तर व्यासपीठावर माध्यमिक शालेय समितीचे

## श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयाचे स्नेहसंमेलन संपन्न

अध्यक्ष प्रशांत भानप, सेवानिवृत्त शिक्षक तथा स्थानिक संस्था सभासद बळीराम सोळंके गुरुजी, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, डॉ शितल भावसार, स्नेहसंमेलन प्रमुख मुकेश काळे, सहसंमेलन प्रमुख शिरीष देशमुख, विद्यार्थीनी प्रतिनिधी कु. श्रावणी सोळंके, विद्यार्थी प्रतिनिधी चि संजोग बनसोडे इत्यादी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात संमेलन गीत, दिपप्रज्वलन व माता सरस्वती, भारत माता व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते, विज्ञान प्रदर्शन, गणित व विज्ञान रांगोळी प्रदर्शनाचे उदघाटन संपन्न झाले. यानंतर बैठे कवायत, स्व आशा भावसार पुरस्कार २०२५ वितरण करण्यात आले. या पुरस्काराचे मानकरी चि. समर्थ बनसोडे व कु अंकिता अस्वले हे होते, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार, दि.२९ जानेवारी २०२५ । पान ७

# 'जीबीएस'वर इंजेक्शन आणि उपचार मिळणार मोफत; महापालिकेच्या निर्णयाने पुणेकरांना दिलासा!

पुणे । प्रतिनिधी

गुइलेन बॅरी सिंड्रोम या दुर्मिळ आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत असताना आता दिलासादायक माहिती समोर आली आहे. या आजाराच्या रुग्णांना आता इम्युनोग्लोब्यूलिन हे इंजेक्शन मोफत देण्यात येणार असून, खाजगी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांना गरीब योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाणार आहे. तसेच कमला नेहरू रुग्णालयातील रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत.



जीबीएस या आजारावरील उपचार खर्चिक असल्याने या आजारावर मोफत उपचार करण्यात यावे अशी मागणी करण्यात येत होती. अखेर पुणे महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी जीबीएसवर कमला नेहरु रुग्णालयात मोफत उपचार केले जाणार असल्याचे सांगितले आहे. त्यानुसार या आजारावर कमला नेहरू रुग्णालयात उपचार घेणाऱ्या रुग्णांसाठी मोफत उपचार आणि इम्युनोग्लोब्यूलिन इंजेक्शन दिले जाणार आहे. तर खाजगी रुग्णालयात जीबीएसवर शहरी गरीब योजनेअंतर्गत दोन लाखपर्यंतच्या उपचारांसाठी आर्थिक मदत केली जाणार आहे, या निर्णयामुळे पुणेकरांना दिलासा मिळाला आहे.

## दूषित पाण्यामुळे आजाराला आमंत्रण

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील जीबीएसची रुग्णसंख्या तब्बल १११ वर जाऊन पोहचली असून, या आजाराने पुणेकरांची चिंता वाढवली आहे. दिवसागणिक या आजाराच्या रुग्णसंख्येत वाढ होत आहे. उपचार सुरू असलेल्या रुग्णापैकी काही रुग्ण हे व्हेटिलेटरवर असल्याचे सांगण्यात येत आहे. आतापर्यंत एक महिला आणि व्यक्तीचा या आजारामुळे मृत्यू झाला आहे. या आजाराचा संसर्ग दूषित पाण्यामूळे होत असल्याचे समोर आले आहे. या आजाराचे रुग्ण नांदेड गाव आणि आजूबाजूच्या परिसरात अधिक असल्याचे समजते.

### पुण्यात ७ जणांचे पथक

पुण्यात गइलेन बॅरी सिंड्रोमचे रुग्ण वाढत असल्याची गांभीर्याने दखल केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यालयाने घेतली असून पुण्यात सोमवारी सात सदस्यांचे पथक पाठवण्यात आले आहे. हे पथक जीबीएस नियंत्रणात आणकरिता व्यवस्थापन करण्यासाठी आरोग्य विभागाला मदत करणार आहे.

### आरोग्यमंत्र्यांच्या सूचनांची दखल

या आजाराची गांभीर्याने दखल पुणे महापालिकेने घेतली असून आरोग्य विभागाच्या वतीने सर्वेक्षण मोहिम हाती घेण्यात आली आहे. नुकतेच राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी या आजाराच्या पार्श्वभूमीवर पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत सर्व माहिती जाणून घेतली. तसेच या आजारावर करावयाच्या उपाययोजना राबवण्याचे आदेश आबिटकर यांनी पालिका प्रशासनाला दिले आहेत. नांदेड गाव परिसरात असणाऱ्या विहिरीच्या पाण्यामुळे या आजाराचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे सांगण्यात आले होते. त्यामुळे या भागातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी देण्यात यावे, अशा सूचना आरोग्यमंत्र्यांनी पालिका प्रशासनाला केल्या होत्या.

# पुण्यात वाहन चोरी करणारा अल्पवयीन ताब्यात; ५ दुचाकी अन् दोन रिक्षा जप्त

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, पुण्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता शहर परिसरात वाहनचोरी करणार्या अल्पवयीनाला वारजे पोलिसांच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. त्याच्याकडून ५ दुचाकी आणि २ रिक्षा जप्त करण्यात आल्या असून, वारजे माळवाडी, राजगड, भोसरी, येरवडा पोलीस ठाण्यात सात गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. मौजमजेसाठी त्याने वाहनचोरीचे गुन्हे केल्याचे समोर आले आहे. ही कारवाई वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक संजय नरळे, अंमलदार शरद पोळ, योगेश वाघ, सागर कुंभार यांच्यासह पथकाने केली आहे.



पुणे शहरात वाहनचोरीचे गुन्हे वाढले आहेत. मध्यवर्ती भागासह उपनगरांत वाहन चोरीला जाण्याचे प्रमाण मोठे आहे. या पार्श्वभूमीवर वारजे पोलिसांचे पथक हद्दीत गस्तीवर होते. त्यादरम्यान येथील बारटक्के हॉस्पिटलजवळ एकजण दुचाकीवर संशयितरित्या थांबल्याची माहिती पथकाला मिळाली. सापळा रचून संबंधीताला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याच्याकडील दुचाकी ही चोरीची असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्या पालकासमक्ष चौकशी केली असता त्याने शहराच्या विविध भागातून वाहनचोरी केल्याचे सांगितले. त्यानूसार पोलिसांनी त्याच्याकडून ५ दुचाकी, दोन रिक्षा जप्त केल्या.



# पोलीस आयुक्त अमितेशकुमार, आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी वाघोलीतील वाहतूक कोंडीची केली पाहणी

पुणे । प्रतिनिधी

पोलीस आयुक्त अमितेश कुमार आणि आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी वाघोली परिसरातील वाहतुक कोंडीची संयुक्तीक पहाणी केली. यानंतर तेथे करावयाच्या तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली.

यावेळी महापालिका, पीएमआरडीए, पीएमडब्ल्यु, महावितरण, प्रादेशीक परिवहन कार्यालय यांचे अधिकारी उपस्थित होते. तेथील नागरिकांशी संवाद साधून त्यांच्याही समस्या ऐकूण घेतल्या. यानंतर संबंधीत विभागांना पुर्तता करुन घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# धक्कादायक! विद्यार्थीनीवर अत्याचार करुन जीवे मारण्याची १०० रुपयांत सुपारी; इंग्रजी शाळेतील खळबळजनक प्रकार

बारामती । प्रतिनिधी

पुणे : दौंडमध्ये विद्यार्थ्याने पालकांची खोटी स्वाक्षरी केल्याचं शिक्षकांना (ढशरलहशी) सांगितल्याचा राग मनात धरून एका विद्यार्थ्याने अल्पवयीन विद्यार्थिनीवर आधी बलात्कार करावा आणि नंतर तिचा खून करावा, यासाठी चक्क १०० रुपयांची सुपारी त्याच शाळेत दुसऱ्या वर्गात शिकणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्याला दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. २२ जानेवारी रोजी दौंड (ऊींपव) येथील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हा खळबळजनक प्रकार घडला. मात्र,आपल्या शाळेची (डलहेश्र) बदनामी होऊ नये म्हणून तो प्रकार दडपण्याचा प्रयत्न शाळा प्रशासनाकडून केला गेला.दरम्यान, विद्यार्थिनींने घडलेला प्रकार घरी पालकांना सांगितल्यानंतर पालकांच्या फिर्यादीवरून दौंड पोलीस ठाण्यात मुख्याध्यापकासह वर्गशिक्षक व शिक्षिका, अशा तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, या घटनेनं शिक्षण क्षेत्रात आणि जिल्ह्यात खळबळ उडाली असून शाळेतील मुलांची मानसिकता कुठल्या स्तराला पोहचलीय, याची चर्चा सुरू झालीय.




दौड शहरातील एका इंग्रजी माध्यमाच्या शाळेत हा सर्व प्रकार घडला आहे. वर्गातील एका विद्यार्थ्याने पालकांची खोटी स्वाक्षरी केली होती. ती सही त्याच वर्गात शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने पाहिली होती. याची माहिती तिने वर्गशिक्षिकेला दिली. याचा राग संबंधित विद्यार्थ्यांने मनात धरला होता. संबंधित विद्यार्थी व त्याच्या मित्राने इयत्ता नववीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला संबंधित विद्यार्थिनीवर अगोदर बलात्कार कर आणि नंतर तिला मारून टाक यासाठी १०० रुपयांची सुपारी दिली. मात्र, ज्या विद्यार्थ्याला याबाबतची सुपारी दिली त्या विद्यार्थ्याने ही सर्व घटना त्या विद्यार्थिनीला येऊन सांगितली. त्यानंतर या विद्यार्थिनीने तिच्या घरी याची माहिती दिली. या अल्पवयीन विद्यार्थिनीच्या वडिलांनी वर्गशिक्षक, सुपर वायझरसह मुख्याध्यापकांकडे याबाबत विचारणा केली. मात्र, त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर संबंधित अल्पवयीन विद्यार्थिनीसह तिच्या पालकांनी दौंड पोलीस ठाणे गाठले. संबंधित अल्पवयीन विद्यार्थिनीच्या वडिलांच्या फिर्यादीवरून मानसिक त्रास देत तिचे शैक्षणिक नुकसान केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, फिर्यादी स्वत:ही शिक्षक आहेत.

### मुख्याध्यापकासह तिघांवर गुन्हा

शाळेचे मुख्याध्यापक आणि दोन शिक्षकांनी शाळेची बदनामी होऊ नये म्हणून तो प्रकार दडपण्याचा प्रयत्न केला. तसेच अल्पवयीन विद्यार्थिनीनेच मुलाची बदनामी करण्याच्या हेतुने सुपारी दिल्याचे सांगत तिला मानसिक त्रास देत तिचे शैक्षणिक नुकसान केल्याप्रकरणी मुख्याध्यापक डीमोलो जोवीन, वर्गशिक्षक आणि शिक्षिका अशा तिघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई; खून प्रकरणातील फरार माजी उपसरपंचाला ठोकल्या बेड्या

**पुणे । प्रतिनिधी**

गाडीतील पेट्रोल संपल्याने रस्त्या लगत लावलेल्या गाडीतील पेट्रोल काढताना पकडलेल्या तरुणाला पेट्रोल चोरीच्या संशयावरून केलेल्या मारहाणीत तरुणाचा मृत्यू झाला होता. याप्रकरणात खूनाचा गुन्हा नोंदविल्यानंतर फरार झालेल्या त्या उपसरपंचाला पोलिसांनी दोन महिन्यानंतर बेड्या ठोकल्या आहेत.



माजी उपसरपंच सुशांत कुटे (रा. नर्हे) असे अटक केलेल्याचे नाव आहे. यापूर्वी याप्रकरणात गौरव संजय कुटे (वय २४), अजिंक्य चंद्रकांत गांडले (वय २०) आणि राहुल सोमनाथ लोहार (वय २३, रा. तिघेही रा. मानाजीनगर, नर्हे) यांना अटक केली होती. या हल्ल्यात समर्थ नेताजी भगत (वय २०, रा. व्यंकटेश्वरा सोसायटी, अभिनव कॉलेज रोड, नर्हे) या तरूणाचा खून झाला होता. याप्रकरणी सिंहगड रोड पोलिसांत गुन्हा नोंद होता. तक्रारदार नेताजी पिरंगुटमधील एका कंपनीतील वाहनावर चालक आहेत. तर मुलगा समर्थ खासगी कंपनीत कामाला होता. दरम्यान, २५ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसातच्या सुमारास मुलगा समर्थचा फोन आला. त्याला मानाजीनगर गणपती मंदिर येथे तीन ते चार लोकांनी मारहाण केल्याचे सांगितले. तसेच तुम्ही लवकर या, असेही कळविले. तक्रारदार पोहचले, तेव्हा काही लोक जमलेले तर मुलगा जखमी अवस्थेत बसलेला दिसला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल केले. परंतु, उपचारादरम्यान समर्थचा मृत्यू झाला होता. तपासानंतर पोलिसांनी याप्रकरणात खूनाचा गुन्हा नोंदविला होता. तेव्हापासून सुशांत कुटे फरार झाला होता. पोलिसांनी तिघांना पकडले होते. पण कुटे फरार होता. दरम्यान, तो वडगाव बुद्रक परिसरात आल्याची माहिती सिंहगड रोड पोलिसांना मिळाली. पथकाने त्याला पकडले. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक दिलीप दाइंगडे व पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे यांच्या पथकाने केली.

# आयटी हब असलेल्या पुण्यात नोकऱ्यांची मारामार; जॉबसाठी हजारो तरूण रांगेत, बेरोजगारीचे भीषण वास्तव समोर

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहराला शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखले जाते. विद्येचे माहेरघर म्हणून पुणे शहराची ओळख आहे. दरम्यान सध्याच्या काळात पुणे हे आयटी हब म्हणून ओळखले जातात. पुण्याच्या विविध भागात अनेक अय्तो हब तयार झाले आहेत. देश-विदेशातून हजारो लोक आयटी क्षेत्रात काम करणयासाठी पुण्यात येताना पाहायला मिळतात. पुण्यात मोठ्या आयटीहब निर्माण झाले आहे. अनेक कंपन्या प्लेसमेंट करत असतात. एखादा व्यक्ती सोडून गेला किंवा एखाद्या प्रोजेक्ट साठी कंपनी अनेक जागांसाठी भरती करते. याच संबंधित एक व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाला आहे. २०० जागांसाठी हजारो तरुण नोकरीसाठी रांगेत उभे आहेत.

पुण्यातील आयटी हब समजल्या जाणाऱ्या एका भागातील एक मोठ्या आयटी कंपनीने काही जागांवर भरतीसाठी जाहिरात काढली. दरम्यान या कंपनीत नोकरी मिळवण्यासाठी हजारो तरुण तरूणी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे पाहायला मिळाले. याबाबतचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. महाराष्ट्र काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी हा व्हिडिओ व्हायरल केला आहे.


या कंपनीत नोकरी मिळवण्यासाठी इच्छुक तरुण आणि तरूणी यांनी मुलाखतीसाठी गर्दी केली होती. या ठिकाणी तोबा गर्दी झाल्याचे पाहायला मिळाले. साधारण १ किलोमीटर पेक्षा जास्त लांबीची ही गर्दी असल्याचे समोर येत आहे. याबाबतचा व्हिडिओ सोशल मिडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. आयटी कंपनीने केवळ २०० जागांसाठी मुलाखती ठेवल्या होत्या. मात्र नोकरी मिळवण्यासाठी तरुणांनी मोठी गर्दी केली होती. व्हिडिओ पाहिल्यानंतर आयटी क्षेत्रात देखील बेरोजगारी निर्माण झाली आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. आयटी सेक्टरमध्ये नोकरी करणयासाठी किती तरी तरूणी तरुण प्रयत्नशील असतात. मात्र हा व्हिडिओ बेरोजगारी निर्माण होत असल्याचे चित्र दर्शवत आहे असे दिसून येत आहे. हा व्हिडिओ पुण्याच्या मगरपट्टा भागातील असल्याचे म्हटले जात आहे. मात्र नवराष्ट्र याची पुष्टी करत नाही.

हा व्हिडिओ सोशल मिडियावर खूप मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ महराष्ट्र काँग्रेसचे प्रवक्त अतुल लोंढे यांनी एक्सवरून शेअर केला आहे. यामध्ये त्यांनी २०० जागांसाठी कंपनीने जाहिरात दिली. तर हजारो इंजिनीअर कंपनीच्या बाहेर रांगेत उभे राहीले. नवीन भारतात नोकऱ्यांची देखील आवश्यकता आहे, अशा प्रकारचे ट्वीट अतुल लोंढे यांनी केले आहे. त्यामुळे देशात बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# पुण्यात चोरट्यांची दहशत; हडपसरमध्ये महिलेला चाकूच्या धाकाने लुटले

पुणे । प्रतिनिधी

राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता हडपसर येथील मगरपट्टा सिटीत ज्येष्ठ महिलेला चाकूच्या धाकाने लुटल्याची घटना घडली आहे. याबाबत ज्येष्ठ महिलेने हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानूसार, दोन चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार ज्येष्ठ महिला हडपसर भागातील भोसले गार्डन परिसरात राहायला आहेत. २२ जानेवारी रोजी त्या वानवडीतील कमांड हॉस्पिटलमध्ये निघाल्या होत्या. दुपारी तीनच्या सुमारास मगरपट्टा चौकातील उड्डाणपुलाजवळ त्या रिक्षाची वाट पाहत थांबल्या होत्या. परिसरातील महादेव मंदिराजवळ दोन चोरट्यांनी त्यांना अडवले, चाकूचा धाक दाखविला. त्यांच्याकडील ४२ हजारांचे सोन्याचे दागिने आणि पैसे ठेवलेले पाकिट असा मुद्देमाल लुटून चोरटे पसार झाले. दरम्यान घटनेनंतर घाबरलेल्या महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी सीसीटीव्ही तपासले असून, पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक महेश कवळे अधिक तपास करत आहेत.

# दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचा राग; आई अन् भावावर कोयत्याने सपासप वार

पुणे । प्रतिनिधी

दारू पिण्यास पैसे न दिल्याने आई व भावावर कोयत्याने वार केल्याची घटना सेनापती बापट रस्ता येथील रामोशीवाडीत घडली आहे. याप्रकरणी गणेश अरुण जाधव (वय २८, रा. रामोशीवाडी, रत्ना हॉस्पिटलमागे) याला अटक करण्यात आली आहे. याबाबत गणेश याचा मोठा भाऊ दिगंबर (वय ३५) यांनी चतु:शृंगी पोलिसांत तक्रार दिली आहे. गणेश याने केलेल्या हल्ल्यात दिगंबर आणि त्यांची आई जखमी झाले. त्यांच्यावर ससून रुग्णालयात उपचार करण्यात आले.

पोलिसांच्या माहितीनुसार, गणेशला दारूचे व्यसन आहे. शनिवारी (२५ जानेवारी) सायंकाळी सातच्या सुमारास गणेश घरी आला. त्याने आईकडे दारू पिण्यासाठी २०० रुपये मागितले. आईने पैसे देण्यास नकार दिल्याने तो चिडला. त्याने आईला शिवीगाळ केली, तसेच मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी मोठा भाऊ दिगंबर यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला. तेव्हा गणेशने घरात लाकडे फोडण्यासाठी ठेवलेला कोयता उचलला आणि भाऊ दिगंबर यांच्यावर हल्ला केला. दिगंबर यांच्या डोक्यात कोयता मारला. दरम्यान आईने मध्यस्थी केली. गणेशने आईच्या डोक्यात कोयत्याने वार केला. आरोपीने केलेल्या हल्ल्यात दिगंबर आणि त्यांची आई जखमी झाली. जखमींना तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. आई आणि भावाच्या खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी आरोपी गणेश याला अटक करण्यात आली. सहायक निरीक्षक गणेश धामणे अधिक तपास करत आहेत.

# वैद्यकीय प्रवेशाच्या आमिषाने व्यावसायिकाची फसवणूक; तब्बल ४० लाखांना घातला गंडा

पुणे । प्रतिनिधी

राज्यात फसवणुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून फसवणुकीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये प्रवेश सुरू झाल्यानंतर वैद्यकीय प्रवेशासाठी तसेच इंजिनिअरींग व इतर महत्वाच्या शाखा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्याच्या आमिषाने फसवणूक करणारी टोळी पुण्यात सक्रिय असल्याचे दिसते. दरवर्षी प्रवेशाच्या निमित्ताने फसवणूक होते. परंतु, या टोळ्या मात्र समोर येत नसल्याचे दिसते.

दरम्यान, पुन्हा एकदा एका व्यावसायिकाला मुलीला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याच्या आमिषाने ४० लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी सुनील कुमार (वय ४५), सौरभ गुप्ता (वय ४०), विकास गुप्ता (वय २८), रणधीर सिंग (वय ३०), प्रियांका मिश्रा यांच्यासह एकावर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका व्यावसायिकाने हडपसर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार व्यावसायिक असून, ते मगरपट्टा सिटीत राहायला आहेत. तक्रारदार व्यावसायिकाच्या मुलीला वैद्यकीय शाखेत प्रवेश घ्यायचा होता. आरोपी मध्यप्रदेशातील इंदूरमध्ये राहायला आहेत, आरोपींशी व्यावसायिकाची एका व्यक्तीमार्फत ओळख झाली होती. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात व्यावसायिकाने आरोपींची भेट घेतली. आरोपींनी खासगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखविले. नंतर त्यांच्याकडून वेळोवेळी ६० लाख रुपये घेतले. त्यांनी रोख व ऑनलाइन स्वरुपात आरोपींना पैसे दिले. पैसे दिल्यानंतरही प्रवेश मिळाला नाही. आरोपींकडे विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. आरोपीना त्यांनी पैसे परत करण्यास सांगितले. आरोपींनी २० लाख रुपये परत केले. उर्वरित ४० लाख रुपये दिले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ निरीक्षक संजय मोगले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक दीपक बर्गे तपास करत आहेत